महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: ३, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार १६ एप्रिल २०२४ ते सोमवार २२ एप्रिल २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301


## संक्षिप्त

### यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस; हवामान विभागाचा अंदाज

■ पुणे: अभिजीत येरल्लू

यंदा एक जून ते ३० सप्टेंबर, या चार महिन्यांत देशात सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्यूंजय महापात्रा म्हणाले, जगभरातील स्थिती मोसमी पावसाला पोषक आहे. त्यामुळे सरासरीपेक्षा जास्त



म्हणजे १०६ टक्के मोसमी पावसाचा अंदाज आहे. प्रशांत महासागरातील एल-निनोची स्थिती सध्या सक्रिय आहे. जूनच्या सुरुवातीपर्यंत एल-निनो निष्क्रिय स्थितीत जाईल आणि ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये ला-निना सक्रिय होईल. हिंद महासागर द्विध्रुविता (इंडियन ओशन डायपोल, आयओडी) सध्या निष्क्रिय आहे. जूनच्या सुरुवातीस आयओडी सक्रिय होईल. युरोशियातील (युरोप आणि आशिया) बर्फाच्छादित क्षेत्र मार्च-एप्रिलमध्ये सरासरीपेक्षा कमी राहिले, ही सर्व स्थिती नैऋत्य मोसमी पावसासाठी पोषक आहे. त्यामुळे सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे.

### 'केवळ एकच नेता' ही कल्पनाच भारतीय तरुणांचा अपमान

■ मुंबई: सम्यक कासारे

काँग्रेसचे नेते आणि लोकसभा वायनाड मतदारसंघाचे उमेदवार राहुल गांधी हे सध्या केरळमध्ये आहेत. दरम्यान, प्रचारसभेत बोलताना राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. राहुल गांधी यांनी 'केवळ एकच नेता' ही कल्पनाच भारतीय तरुणांचा अपमान



असल्याचे म्हणत, भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. राहुल गांधी यांनी केरळ येथील प्रचारादरम्यान बोलताना सत्ताधारी भाजप आणि पंतप्रधानांवर निशाणा साधला. यावेळी ते म्हणाले, आज मुख्य लढा आरएसएसच्या विचारसरणीविरुद्ध आहे. भाजपचे लोक, पंतप्रधान 'एक राष्ट्र, एक लोक, एक भाषा, एक नेता' असा उल्लेख करतात. परंतु भाषा ही वरून लादलेली गोष्ट नाही. भाषा ही अशी गोष्ट आहे जी व्यक्तीच्या आतून, व्यक्तीच्या हृदयातून बाहेर पडते. तुमची भाषा हिंदीपेक्षा निकृष्ट आहे, असे केरळमधील व्यक्तीला सांगणे म्हणजे केरळच्या लोकांचा अपमान आहे, असेदेखील ते म्हणाले. भारतात फक्त एक नेता असावा ही कल्पनाच प्रत्येक तरुण भारतीयाचा अपमान आहे, असेदेखील काँग्रेस नेते, वायनाड मतदारसंघाचे उमेदवार राहुल गांधी यांनी प्रचारादरम्यान म्हटले.

# काँग्रेसच्या ५० वर्षातील कामापेक्षा माझी १० वर्षातील कामगिरी सरस

## पंतप्रधान मोदींचा छातीठोक दावा



■ नवी दिल्ली: विशेष प्रतिनिधी

**'निवडणुकांना गांभिर्याने घेणे लोकशाहीमध्ये आवश्यक आहे. काँग्रेस सरकारचे ५ दशकांचे काम आणि माझे १० वर्षांचे काम पाहा. कोणत्याही क्षेत्रात तुलना करा. आमच्यात काही कमी असेल पण आमच्या प्रयत्नात कोणतीही कमी नाही. माझे २ वर्ष कोरोनाशी लढण्यात गेले. तरिही आम्ही सर्वांगीण विकास केला. सर्वसमावेशक विकास केला. काँग्रेसच्या मॉडेलपेक्षा आमचे रस्ते चांगले आहेत', असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. एएनआय वृत्तसंस्थेला पीएम मोदींनी मुलाखत दिली. यावेळी ते बोलत होते.**

**माझे निर्णय कोणाला भीती घालण्यासाठी नसतात**

नरेंद्र मोदी म्हणाले, कुटुंबाला मजबूत करण्यासाठी ते ताकद लावतात. मी देशाला मजबूत करण्यासाठी काम करतोय. देश मजबूत झाला तर लोकांना समाधान मिळते. २०२४ मध्ये निवडणुकीचे मैदान आहे तर आम्ही आमचे कामे सांगतो. कोणालाही घाबरण्याची गरज नसते. माझे निर्णय कोणाला भीती घालण्यासाठी नसतात, तर जनतेचे कल्याण करण्यासाठी असतात. अनेक सरकार म्हणतात आम्ही सर्वकाही केलं. पण मी मानत नाही की, मी सर्वकाही केले. आम्ही फक्त भरपूर काही करण्याचा प्रयत्न केला आहे. मी म्हणतो जे झालयं तो फक्त ट्रेलर आहे.

**पुढील २५ वर्षांचे माझे प्लॉनिंग आहे**

पुढे बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले, मी अनेक वर्ष मुख्यमंत्री होतो. सातत्याने निवडणुका आचारसंहिता लागू होतात. माझ्या राज्यातील मोठे अधिकारी निवडणुकीच्या कामाला जातात. त्यामुळे मी अधिकारांना अगोदरच काम देतो. निवडणुकांसाठी १०० दिवस अगोदर पासून प्लॅन तयार केला आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## मराठा आरक्षण प्रश्न मार्गी न लागल्यास विधानसभेची तयारी ताकदीने करणार

■ मुंबई: यश सावंत

मराठा आरक्षणाचा प्रश्न राज्य सरकारने ६ जूनपर्यंत मार्गी न लावल्यास विधानसभा निवडणुकीची ताकदीने तयारी करणार आहोत. यासाठी सर्व जाती-धर्मांच्या लोकांना सोबत घेतले जाईल. मी ४ जूनपासून आमरण उपोषण करणार असून पुढील दिशा ठरविण्यासाठी श्री क्षेत्र नारायणगड (जि. बीड) येथे ८ जूनला ९०० एकरामध्ये मराठा बांधवांची भव्य सभा होणार आहे, असे मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईत रविवारी सांगितले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त चैत्यभुमीवर त्यांच्या स्मृतीस अभिवादन केल्यानंतर जरांगे बोलत होते. जरांगे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत ज्याला पाडायचे, त्याला पाडा, असे आवाहन मी आधीच मराठा बांधवांना केले आहे. राजकारण माझा मार्ग नाही. पणआजवरच्या सर्वच सरकारांनी मराठा समाजाला फसवले आहे. आता आम्ही १०० टक्के आरक्षणाची लढाई लढणार आहोत. दरम्यान, मनोज जरांगे-पाटील हे चैत्यभूमी येथून शिवाजी मंदिर याठिकाणी गेले. तेथे मराठा समाज बांधवांसमवेत बैठक झाली. मुंबई, नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील मराठा समाज बांधव या बैठकीस उपस्थित होते.



## 'न्यायव्यवस्थेला कमजोर करण्याचा प्रयत्न...' २१ निवृत्त न्यायाधिशांचे CJI धनंजय चंद्रचूड यांना पत्र

■ नवी दिल्ली: वृत्तसंस्था

देशातील २१ निवृत्त न्यायाधिशांनी भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी एक पत्र लिहिले आहे. या पत्राच्या माध्यमातून निवृत्त न्यायाधिशांनी 'न्यायव्यवस्थेला अनावश्यक दबावापासून वाचवण्याची गरज' असल्याचे



म्हटले आहे. या संदर्भातील पत्र एएनआयने शेअर करत वृत्त दिले आहे. या पत्रात नाव असलेल्या आणि सह्या केलेल्या २१ निवृत्त न्यायाधिशांनी म्हटले आहे की, आम्ही सहन केलेला दबाव, चुकीची माहिती आणि सार्वजनिक अपमानाच्या माध्यमातून न्यायव्यवस्थेला कमजोर करण्याचा प्रयत्न काही गटांकडून होत आहे. या वाढत्या प्रयत्नांबद्दल आम्ही चिंता व्यक्त करण्यासाठी हे पत्र लिहित आहोत. आमच्या लक्षात आले आहे की, संकुचित राजकीय हितसंबंध आणि वैयक्तिक फायद्यांनी प्रेरित हे घटक अशाप्रकारे न्यायव्यवस्थेवर दबाबव टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. यामुळे न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास उडण्याची अधिक भीती आहे, असेदेखील निवृत्त न्यायाधिशांनी पत्रात म्हटले आहे. आम्ही विशेषत: चुकीची माहिती देण्याचे डावपेच आणि न्यायपालिकेच्या विरोधात जनभावना वाढवण्याबद्दल चिंतित आहोत, जे केवळ अनैतिकच नाही तर आपल्या लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना देखील हानिकारक आहे. एखाद्याच्या मतांशी जुळणारे न्यायालयीन निर्णय, निवडकपणे प्रशंसा करण्याची प्रथा या गोष्टी न्यायिक पुनरावलोकन (शेष पृष्ठ २ वर)

## सलमानच्या घराबाहेरील गोळीबार प्रकरण; विरोधकांचा राज्य सरकारवर हल्लाबोल

■ मुंबई: माधव अलवा

अभिनेता सलमान खान याच्या वांद्रे येथील घरावर रविवारी सकाळी अज्ञातांनी केलेल्या गोळीबाराचे तीव्र पडसाद राजकीय वर्तुळात उमटले. या प्रकरणावरून



विरोधकांनी राज्य सरकारला लक्ष्य केले. राज्यात कायदा व सुव्यवस्था उद्ध्वस्त झाल्याची टीका शिवसेना (ठाकरे गटाचे) खा.संजय राऊत यांनी केली, तर ट्रिपल इंजिन सरकारमधील कोणाचा तरी आशीर्वाद असल्याशिवाय हे होऊ शकणार नाही, असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.(शेष पृष्ठ २ वर)

## लोकसभा निवडणुकीत शंभर टक्के यशासाठी अजित पवार यांची सर्वात मोठी रणनीती, विरोधकांना धोबीपछाड देणार

■ मुंबई: संजीनी खाडे

लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीमधील तिन्ही पक्षांचे जागा वाटप निश्चित झालेले नाही. आठ जागांवर अजून एकमत होऊ शकले नाही. त्यात मुंबईतील दक्षिण मुंबईसह तीन जागा आणि ठाणे, पालघर, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जागा आहेत. परंतु या सर्व जागा भाजप किंवा शिवसेनेच्या आहेत. अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पाच जागा लढवणार आहे. या पाचही जागांवर विजय मिळवण्यासाठी अजित पवार यांनी मेगा प्लॅन तयार केला आहे. या रणनीतीनंतर शंभर टक्के विजय मिळण्याचा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसच्या



नेत्यांकडून केला जात आहे.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून रायगड, परभणी, बारामती, शिरूर, धाराशिव या पाच जागांवर उमेदवार जाहीर झाले आहे. या पाचही जागा निवडून आणण्याची रणनीती पक्षात तयार झाली आहे. त्यासाठी या ५ लोकसभा मतदार संघामध्ये उर्वरित ४२ लोकसभा मतदार संघातील प्रमुख कार्यकर्ते हे या निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणार आहेत. कार्यकर्त्यांची ही फौज राष्ट्रवादीच्या उमेदवाराला विजयापर्यंत नेणार आहे. प्रत्येक वार्ड आणि प्रत्येक घरात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते पोहचणार आहेत. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्यभरातील लोकसभेच्या ५ जागांवर निवडणूक लढवत आहेत.(शेष पृष्ठ २ वर)

## निवडणूक आयोगाकडून विक्रमी ४,६५० कोटी रुपये जप्त


■ नवी दिल्ली: प्रगती शर्मा


निवडणूक आली की रोख रक्कम सापडणं ही बाब आता काही नवी राहिलेली नाही. मात्र निवडणूक आयोगाने आत्तापर्यंतची सर्वात मोठी रक्कम ताब्यात घेतली आहे. ही रक्कम थोडी थोडकी नाही तर तब्बल १०० कोटींची आहे. निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्यांनी पोस्ट करत ही माहिती दिली आहे. रोज सरासरी १०० कोटी रुपये जप्त करण्यात येत आहेत सर्वाधिक रक्कम आहे. तसंच २०१९ च्या तुलनेतही ही रक्कम सर्वाधिक आहे. असंही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

निवडणुकीत मनी आणि मसल पॉवर रोखण्याचं आव्हान निवडणूक आयोगासमोर आहे. मात्र या आव्हानाला आपण समर्थपणे तोंड देत आहोत असं निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं आहे. मनी आणि मसल पावरचा वापर कुणी केल्यास आम्ही कठोर कारवाई करु.



असंही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. १ मार्च ते १५ एप्रिलल या कालावधीत जप्त केलेली रक्कम ४ हजार ६५० कोटी रुपये इतकी आहे. निवडणूक आयोगाने आत्तापर्यंत म्हणजेच १ मार्च ते १५ एप्रिल या ४५ दिवसांच्या कालावधीत दिवसाला सरासरी १०० कोटी रुपये जप्त केले आहेत. आत्तापर्यंत या रोख रक्कमेचा डोंगर ४६५० कोटी इतका झाला आहे. जप्त होणाऱ्या रोख रक्कमेपैकी ही प्रचाराच्या दरम्यान साड्या, मद्य, भेटवस्तू यांचं वाटप केल्यास कारवाई केली जाणार आहे. निवडणूक प्रचारादरम्यान अशा कुठल्याही व्यवहाराला थारा दिला जाणार नाही. ही माहिती राजीव कुमार यांनी दिली आहे. त्याचप्रमाणे खोट्या बातम्यांमागची सत्यताही आम्ही तपासणार आहोत. त्यासाठी वेबसाईट तयार केली जाईल असंही मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी म्हटलं आहे.




## मोदींचा खरा चेहरा कोणता?

''शरद पवार हे माझे राजकीय गुरू आहेत. त्यांनी कृषी क्षेत्रात उत्तम काम केले. त्यांनीच मला राजकारणात बोट धरून चालायला शिकवले. पाच दशकांपेक्षा अधिक राजकीय अनुभव असलेल्या पवारांचे मी मार्गदर्शन घेत असतो. देशासमोरच्या प्रश्नांवर आम्ही चर्चा करतो. महिन्यातून किमान दोन-तीनदा तरी मी त्यांच्याशी बोलतो,'' हे विधान आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे. संसदेत असो वा सार्वजनिक कार्यक्रमात मोदी शरद पवारांचे कौतुक करताना दिसले. परंतु हेच मोदी अलीकडे, ''पवारांनी आयुष्यभर शेतकऱ्यांच्या नावाने राजकारण केले. अनेक वर्षे केंद्रात कृषीमंत्री असून शेतकऱ्यांसाठी त्यांनी काय केले?'', असा प्रश्न करतात. तेव्हा मोदींचा खरा चेहरा कोणता, हा प्रश्न पडतो. चारशेपार म्हणणाऱ्या मोदींना 'सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज'च्या (सीएसडीएस) निवडणूकपूर्व सर्वेक्षणाने धक्का दिला आहे.

गेल्या दहा वर्षांत मोदींनी देशात काहीच केले नाही, असे अजिबात म्हणता येणार नाही. 'उज्ज्वला', 'जनधन', 'डिजिटल इंडिया' 'मेक इन इंडिया' अशा अनेकविध कल्याणकारी योजना, ओबीसी आयोगाची स्थापना, 'आयुषमान भारत'सारख्या आरोग्यविषयक योजना लागू करून लोकांच्या मनात आशा निर्माण केली. मोदींचा करिष्मा निर्विवाद आहे. त्यांनी देशातील जनतेची नस ओळखली आहे. लाखोंच्या समुदायाला नेमके काय आवडेल, याची जाण आहे. भारतीय समाज भावनेच्या लाटेवर स्वार होतो. त्यामुळेच मोदींच्या भाषणात देशाच्या वास्तव सद्यस्थितीपेक्षा राममंदिर, नवरात्री, अस्मिता, राष्ट्रवाद असे मुद्दे वारंवार येतात. परंतु समाजाला फार काळ धर्माच्या प्रभावाखाली ठेवता येत नाही. त्यामुळे गेल्या काही सर्वेक्षणांमध्ये जनतेला भेडसावणारे प्रश्न ऐरणीवर येत आहेत. जेव्हा मुख्य प्रश्न ऐरणीवर येतात तेव्हा जनतेच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या नेत्यांची गरज देशाला भासते. पण तसा कोणी नेता समोर दिसला तर त्याच्याविरुद्ध काहूर माजवायचे, असे सत्ताधाऱ्यांचे धोरण दिसते. शरद पवार यांच्याविरुद्ध केली जाणारी ओरड हे त्याचेच उदाहरण म्हणावे लागेल. शरद पवार पुरोगामी विचाराचे आहेत. धर्मनिरपेक्ष नेता, स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कर्ता अशी त्यांची प्रतिमा आहे. देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस फोडल्यानंतर पवारांच्या राजकीय कारकिर्दीचा अस्त झाल्याचे विधान केले होते.

तेच फडणवीस विधिमंडळात पवारांच्या कार्याचे कौतुक करतात. ''कृषिमंत्री म्हणून पवार यांची दशकभराची कामगिरी लक्षवेधी होती. तांदूळ निर्यात करणारा देश म्हणून भारताची ओळख पवारांमुळेच झाली. कापसाच्या गाठी वा साखर निर्यातीमध्ये भारताला जगात दुसऱ्या क्रमांकावर नेणारे पवारच आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय अन्न आणि कृषी संस्थेने पवारांनी कृषी क्षेत्रात केलेल्या क्रांतीचे कौतुक केले'', असे फडणवीस सांगतात, तेव्हा तो महाराष्ट्राचा गौरव ठरतो. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या (यूपीए) काळात शेतकऱ्यांना ७१ हजार कोटींचे कर्ज माफ करण्यात पवारांचा मोठा वाटा राहिला. त्यामुळे, पवारांनी काय केले? हा प्रश्न अप्रस्तुत ठरतो. हेच मोदी दोन वर्षांपूर्वी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तर देत असताना म्हणतात, ''कोरोनावर सर्वपक्षीय बैठक बोलावली. काही पक्षांनी बहिष्कार टाकला. बहिष्काराचा निर्णय 'यूपीए'चा नसल्याने पवार यांनी काही पक्षांशी बोलणे केले आणि तृणमूल कॉंग्रेससह अन्य नेत्यांना घेऊन बैठकीला हजर राहिले.

यासाठी मी शरदरावांचे आभार मानतो.'' एकदा मोदी म्हणाले होते, ''मी मुख्यमंत्री असताना गुजरातच्या योजना 'यूपीए' सरकारकडून अडवल्या जायच्या त्यावेळी पवारच मदतीला यायचे''. चारशेपारच्या घोषणा करत भाजपने आक्रमकपणे प्रचार चालवला आहे. सर्व जाहिरातीत केवळ 'मोदींची गॅरंटी' आणि 'मोदी सरकार' असाच वाक्प्रचार आहे. मोदीच सत्तेत येतील, असे वातावरण निर्माण केले जात आहे. दुसरीकडे भारतातील लोकसभेच्या निवडणुकीबाबत विरोधकांना नामशेष करण्यासाठी केंद्रीय यंत्रणा काम करताहेत, अशी भावना जगभरच्या प्रमुख वृत्तपत्रांची झाली आहे.

# रशियन गुप्तहेर सोर्गीची थरारकथा

**सोर्गी हा देशभक्त गुप्तहेर होता. केवळ पैसे आणि वलय यासाठी तो या क्षेत्रात आला नाही. तो देशभक्त होता आणि त्याची इच्छा नाझींचे निर्दालन करून रशियाला आणि जगाला त्यांच्यापासून वाचवणे ही होती. त्याने हे प्रत्यक्षात आणले ते अशी एक माहिती रशियाला पुरवून की जी हिटलर ची सद्दी संपवायला पुरेशी ठरली.**

जागतिक दुसरे महायुद्ध अगदी जोरात होते त्यावेळची ही गोष्ट. जपान आणि इटली चा मदतीने जर्मनी नवनव्या आघाड्यांवर विजयी ठरत होते. फक्त एक चिंता होती - स्टॅलिनग्राड अजून त्यांच्या हाती लागत नव्हते. त्यावर त्यांचा डोळा होता. दरम्यान स्टॅलीन ला एक खबर मिळाली की जपान रशिया वर आक्रमण करणार नाही कारण थायलंड आणि मलया जिंकण्यासाठी त्यांना तीन लाख सैनिक लागणार होते. ही एक चांगली बातमी होती. त्याने आपले सगळे सैनिक इतर आघाड्यांवरून काढून घेतले आणि स्टॅलिनग्राड मध्ये ठेवले. त्यानंतर तेच हिटलरच्या अधःपतनास कारणीभूत ठरले. ही माहिती पुरवणारा दुसरा तिसरा कोणी नसून डॉ. रिचर्ड सोर्गी होता.

डॉ. रिचर्ड सोर्गी हा एक एकमेवाद्वितीय असा गुप्तहेर होता. तो रशियातील बाकू येथे जन्माला होता. त्याची आई रशियन तर वडील जर्मन होते. जर्मनीत तो एक पत्रकार बनला आणि अनेक भाषा तो अस्खलित बोलू शकत होता. तो उंच आणि देखणा होता. त्याची दूरदृष्टी आणि साम्यवादावरचा विश्वास त्याला रशियाचा गुप्तहेर बनवण्यास कारणीभूत ठरला.

जपान पर्ल हार्बर वर हल्ला करणार ही बातमी सांगणारा स्टॅलीन ला सांगणारा सोर्गी हा प्रथम व्यक्ती होता. या बातमीमुळेच रशियाने आपली युद्धनीती बदलवली आणि अमेरिका या युद्धात उतरली. सोर्गिची सुरुवातीची शाळा होती बर्लिनमध्ये. त्याचे काका आल्फ्रेड सोर्गी हे कार्ल मार्क्स चे सेक्रेटरी होते. सोर्गी वर



त्याच्या काकांचा खूप प्रभाव होता. सोर्गी न पहिल्या जागतिक महायुद्धात सैनिक म्हणून भाग घेतला होता आणि तो दोनदा जखमी झाला होता. हॉस्पिटलमध्ये असताना १९२० साली बर्लीन विद्यापीठातून त्याने राज्यशास्त्रात पदवी मिळवली. त्यानंतर त्याने शिक्षकी पेशा पत्करला. पण लवकरच त्याचा राजीनामा देऊन त्याने कोळशाच्या खाणीत काम स्वीकारले. त्यानंतर १९२२ मध्ये त्याने वर्तमानपत्रांत लिखाण सुरू केले. तोपर्यंत त्याला पाच भाषा अवगत झालेल्या होत्या - फ्रच, रशियन, चिनी, जपानी, जर्मन!

हळूहळू त्याचे आवडीचे क्षेत्र बदलत गेलेत. साम्यवादी पक्षात तो ओढला गेला. १९२७ पर्यंत तो गुप्तहेर बनला होता. फक्त आपली ओळख लपवण्यासाठी तो जर्मन पत्रकार बनून लिहीत राहिला. १९३० मध्ये त्याला चीन मध्ये पाठवण्यात आले. तेथेच त्याला अनेक कामे करण्याची खऱ्या अर्थाने संधी मिळाली. शांघाय ला त्याने आपले एक कार्यालय उघडले आणि होवांग हो, मनामकिंग, कनटेन, बीजिंग, मंचुरिया येथे भटकंती केली. त्यादरम्यान त्याने दोन मित्र बनवले एक जर्मन स्त्री पत्रकार- अग्नेस आणि जपानी पत्रकार होजुमी. त्याच्या अंतापर्यंत ही दोन्ही त्याचेशी निष्ठावान राहिली.


१९३३ मध्ये त्याला नाझी पार्टीचे सभासदत्व मिळाले. ते कसे मिळाले ते आजपर्यंत कुणालाही माहिती नाही. ते एक रहस्यच आहे.

नाझी बनल्यानंतर सोर्गी ने अमेरिकेत, कॅनडात प्रवास केला. जपानमध्ये फिरला. जपानमध्ये तो टोकियोमध्ये थांबला आणि तेथे पत्रकार बनला. टोकियोमध्ये जर्मन दूतावासात प्रवेश मिळवणे ही त्याची तेथे कामगिरी होती. सुरुवातीला त्याला यश मिळाले नाही. पण भाग्य सोर्गी चा बाजूने होते. त्या वेळेस नवीन जर्मन राजदूत टोकियोत आला. त्याला आशियातील राजकारण तितकेसे कळत नव्हते. त्याला एका सल्लागाराची गरज होती. सोर्गी ने त्या पदासाठी अर्ज केला आणि ते त्याला मिळाले. सोर्गी चे प्रयत्न फळाला आले. सोर्गी ने एक खोली डार्क रूम मध्ये रूपांतरित केली. तेथे त्याने महत्त्वाच्या कागदपत्रांचे फोटो काढले. कुणालाही सोर्गी चा संशय आला नव्हता. तो नवा राजदूतच नाही तर लष्करी अधिकारी सुद्धा त्याचा सल्ला घेऊ लागले, त्याचेवर विश्वास ठेवू लागले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सोर्गी ला जर्मन दूतावासात पत्रकार सचिव म्हणून नोकरी मिळाली. ती एक प्रतिष्ठेची नोकरी होती आणि पगारही तेवढाच प्रतिष्ठित होता.

१९४० मध्ये जपान आणि जर्मनीची युती झाल्यानंतर त्याने ही कागदपत्रे होजुमी ला पाठवली. अशी देवघेव ते प्राणिसंग्रहालय, खानावळ, बार मध्ये करत असत. त्यांच्यातले संभाषण हे नेहमी एक दुसऱ्याला सिगारेट मागण्यापासून सुरू होत असे. दुसरा त्याला सिगारेटचे पाकीट देत असे ज्यात सगळी माहिती असे.

१९३५ च्या सुरुवातीला त्याने युरोप कौमिंग्टन ते न्यूयॉर्क असा प्रवास केला. नंतर त्याने सोव्हियत चा व्हिसा घेतला आणि तो रशियाला गेला. तेथून तो जपान ला परतला आणि 'क्लाऊझन आणि कंपनी ' ही कंपनी काढली. त्यात एकट्या क्लाऊझन ची ८५००० येणं गुंतवणूक होती. त्या कंपनीने प्रिटींग मशीन्स बनवण्याचा आणि विकण्याचा फायदेशीर धंदा केला. १९४१ मध्ये त्या कंपनीचे नाव 'जॉइण्ट स्टॉक कंपनी' असे करण्यात आले. क्लाऊझन त्याचा जवळचा बनला. सोर्गी त्याला सर्व माहिती सांगायचा. जपानी गुप्तहेर रिस्तू ला क्लाऊझन ओळखायचा. सोर्गी पुढे अब्जाधीश बनला. हेरेगिरिसाठी लागणारे पैसे त्याला सहज उपलब्ध झाले. त्याने महत्त्वाची माहिती रशियाला पुरवली त्याने मॉस्को ला जे कळवले त्यात या गोष्टी होत्या - जर्मन आर्मी ची बित्तंबातमी, हिटलरचा मॉस्को वरचा हल्ला आणि जपानचे रशियावर हल्ला करण्याच्या निर्णयापासून परावृत्त होणे!

युद्ध संपण्याच्या मार्गावर असताना त्याला आपल्या जिवाला असलेला धोका जाणवला. त्याला लवकरात लवकर रशियात परतायचे होते. पण त्यापूर्वीच तो पकडला गेला. पण त्याच्या चुकीमुळे नव्हे! तर जपानी गुप्तहेर रिस्तू च्या कबुलीजबाबा मुळे तो पकडला गेला. रिस्तू ने सोर्गी आणि क्लाऊझन ला धोका दिला. त्याने सर्वांची खरी ओळख कबूल केली. कुणालाही विश्वास बसला नाही की सोर्गी गुप्तहेर आहे. जर्मन दूत सुद्धा यावर विश्वास ठेवायला तयार नव्हता. त्याने जपानी पोलिसांवर दबाव आणून सोर्गी ला सोडण्याची मागणी केली पण काही उपयोग झाला



नाही. क्लाऊझन ने कबुलीजबाब दिला आणि त्याचे पाहून सोर्गी ने पण कबुली दिली. पण त्यांनी हे ही सांगितले की त्यांनी कधीच कुणा ऑफिसर चा गैरवापर केला नाही कारण स्वतः ऑफिसर्स त्यांना गुप्त गोष्टी सांगत असत. पण त्यावर जपानी पोलिसांनी विश्वास ठेवला नाही. क्लाऊझन आणि सोर्गी दोघांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली गेली. सोर्गी च्या मृत्यू नंतर अमेरिकेने जनरल ऑर्थर यांना सोर्गी वर रिपोर्ट बनवायला सांगितला.

जनरल ऑर्थर यांनी लिहिले - 'सोर्गी ने स्टॅलीन ला वाचवले! ' सोर्गी चे खरे स्वरूप सगळ्या जगाला उघड झाले पण जगभरातल्या नेत्यांना त्याबद्दल स्पष्टीकरण देण्यासाठी सोर्गी जिवंत नव्हता!

# तरूणांमध्ये वाढतोय डिमेंशियाचा धोका, काही वर्षात दुप्पट होणार 'या' पीडितांची संख्या!

पुढील २ दशकांमध्ये म्हणजेच २० वर्षात डिमेंशिया म्हणजेच वेडसरपणाने पीडित लोकांची संख्या दुप्पत होण्याची अंदाज आहे. तर २०४० पर्यंत ब्रिटनमध्ये डिमेंशियाने पीडित लोकांची संख्या दुप्पट होण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी लंडनमध्ये करण्यात आलेल्या एका रिसर्चनुसार, डिमेंशिया आणि खासकरून अल्झायमरसारखे आजार सोसायटीमधे अधिक वेगाने वाढत आहेत. ही स्थिती केवळ एका देशात नाही. जगभरात मानसिक आजारांनी पीडित लोकांची संख्या वेगाने वाढत आहे.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲन्ड पॉलिटिकल सायन्सेस आणि अल्झाइम्स सोसायटी द्वावे करण्यात आलेल्या सर्व्हेमध्ये यूनायटेड किंगडममधे २०४० पर्यंत डिमेंशियाने पीडित लोकांवर देशातील इकॉनॉमीचा एक मोठा भाग खर्च होण्याची वेळ येणार आहे.

या रिसर्चच्या विश्लेषणात असं आढळून आलं की, डिमेंशियाने पीडित लोकांचा खर्च परिवारांवर वाढणार आहे. अशात जर एकाच घरात दोन पीडित असतील तर त्यांना घरखर्च चालवणे देखील कठीण होऊ शकतं. या रिसर्चच्या निष्कर्षाच्या आधारावर सांगण्यात आलं आहे की, आपल्याला लवकरच मानसिक आरोग्यावर प्रभावी पाऊल उचलावे लागतील, नाही तर मानसिक आजाराने पीडित लोकांची संख्येचा दबाव वाढेल.

सूत्रांनुसार, निवडणुकांआधी अल्झायमर सोयायटी सर्वच राजकीय पक्षांना भेटून डिमेंशियाच्या वाढत्या स्थितीवर काम करण्याची मागणी करणार आहेत. आता यावर काय उपाय केले जातील हे बघणं महत्वाचं ठरणार आहे.



पान १ वरुन...

## 'न्यायव्यवस्थेला कमजोर...

आणि कायद्याच्या नियमाचे सार कमी करत नाहीत तर ही न्यायव्यवस्थेवरील टीका असल्याचेदेखील निवृत्त न्यायाधिशांनी या पत्रात म्हटले आहे. अशा अवास्तव दबावाच्या कृतींमुळे आपल्या न्यायव्यवस्थेच्या पावित्र्याचा केवळ अनादर होत नाही तर न्यायपालिकेचे रक्षण करण्याची गरज असलेल्या न्यायपालिकेने कायद्याचे रक्षक या नात्याने न्यायाधीशांनी शपथ घेतलेल्या निष्पक्षता आणि निष्पक्षतेच्या तत्त्वांना थेट आव्हानच दिले आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या नेतृत्वाखालील न्यायव्यवस्थेला अशा दबावांविरुद्ध बळकट करण्यासाठी आणि कायदेशीर व्यवस्थेचे पावित्र्य आणि स्वायत्तता जपली जाईल याची खात्री करण्याचे आवाहन देशातील या निवृत्त न्यायाधिशांनी भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्याकडे पत्राच्या माध्यमातून केले आहे.

## सलमानच्या घराबाहेरील...

दरम्यान, या सर्व प्रकरणानंतर गुन्हेगारांना पाठीशी घालण्यात येणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. अभिनेता सलमान खान याच्या घराबाहेर पहाटे रविवारी दोन अज्ञात बाईकस्वारांनी गोळीबार केला. बिश्नोई टोळीच्या गुंडांनी या गोळीबारीची जबाबदारी स्वीकारली आहे. विशेष म्हणजे राजस्थान येथील हरीण, काळवीट शिकार प्रकरणापासून सलमान हा बिश्नोई गँगच्या हिटलिस्टवर आहे. दरम्यान, या घटनेवरून विरोधकांनी राज्य सरकारला लक्ष्य केले आहे. भरवस्तीत हा गोळीबार झाला असून भर रस्त्यावर गोळीबार होत असेल तर अब की बार गोळीबार सरकार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. सरकारमध्ये कोणाचा तरी गुन्हेगारीला आशीर्वाद आहे त्याशिवाय हे कसे शक्य आहे, असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी केला. तर, हा केवळ इशारा नाही तर या बंदुकीच्या गोळ्यांनी भाजप सरकारची पोलखोल केली आहे. देवेंद्र फडणवीस गृहमंत्री आहेत, पण त्यांचे काम हे विरोधकांवर खोटे गुन्हे लावणे हेच आहे. पोलीस आयुक्त काय करत आहेत, असा सवालही राऊतांनी केला आहे.

दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी सायंकाळी सलमान खानची त्यांच्या निवासस्थानी जाऊन विचारपूस केली. शिंदे गटाने राहुल कनवाल यांनीही सलमानची भेट घेतली. देवाच्या कृपेने सर्व ठीक आहे, पण सलमान भाईला अशा गोष्टींनी फरक पडत नाही, असेही कनवाल यांनी सांगितले.

## लोकसभा निवडणुकीत शंभर...

यामुळे ४२ मतदार संघातील प्रमुख कार्यकर्त्यांवर या ठिकाणांची जबाबदारी दिली आहे. तसेच ४२ मतदार संघात महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते करणार आहेत. या पाच लढतींमध्ये सर्वाधिक लक्ष बारामतीकडे असणार आहे. या ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक रिंगणात आहे. त्यांच्या विरोधात शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे निवडणूक रिंगणात आहे. यामुळे देशभरातील राजकीय निरीक्षकांचेही या लढतीकडे लक्ष लागले आहे.

# कॉंग्रेसच्या ५० वर्षातील कामापेक्षा माझी १० वर्षातील कामगिरी सरस

**(पान १ वरुन)**

मी १५ लाख लोकांचे मत ऐकले की, पुढील काळात भारत कसा झाला पाहिजे? मी तंत्रज्ञाचा उपयोग केला. पुढील २५ वर्षांचे माझे प्लॅनिंग आहे.

**मी १०० वर्षांत कलम ३७० चा निर्णय घेतला**

मी निती आयोगाची मीटिंग बोलावतो. त्यांच्याशी चर्चा करतो. मी तीन टप्प्यांमध्ये काम करणार आहे. भाजपचा जाहिरनामा राबवायचा आहे. सगळकाही मलाच समजत असं नाही. मी एक मिनीट पण वाया घालवू इच्छित नाही. मी १०० वर्षात कलम ३७० चा निर्णय घेतला. तिहेरी तलाक बाबत कायदा केला. प्राण्यांचेही लसीकरण केले, असेही मोदींनी यावेळी बोलताना सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'वन नेशन वन इलेक्शन ही आमची कटिबद्धता आहे. यासंदर्भात आम्ही संसदेमध्येही चर्चा केली. याबाबत आम्ही एक समितीही स्थापन केली होती. या समितीचा अहवालही आलेला आहे. या अहवालामध्ये अनेकांनी सकारात्मक आणि नाविन्यपूर्ण सूचना केल्या आहेत. जर आम्ही हा अहवाल अंमलात आणू शकलो, तर देशाला खूप फायदा होईल', असे पंतप्रधान मोदी यांनी 'एएनआय'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईडी-सीबीआयच्या कारवाईच्या मुद्यांवरही भाष्य केले. ते म्हणाले, 'ईडीच्या कारवाईमध्ये ९७ टक्के अराजकीय व्यक्तींवर कारवाई झाली आणि फक्त तीन टक्के राजकीय लोकांवर कारवाई झाली. ईडीने गेल्या १० वर्षात २२०० कोटी कॅश जप्त केले. मात्र, २०१४ सालच्या आधी फक्त ३४ लाख रुपये कॅश जप्त केले होते'. दरम्यान, युक्रेनमध्ये युद्ध सुरु होते, त्यावेळच्या मुद्यांवरही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाष्य केले. भारतातील विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे आपल्या देशात आणण्यात आल्याचे सांगत ही एक मन हेलावणारी घटना होती, असे ते म्हणाले.

'मी निवडणुकीत जाण्याआधीच तयारीला लागलो आहे. मी गेल्या दोन वर्षांपासून २०४७ ला डोक्यात ठेवून काम करतोय. त्यासाठी देशभरातील लोकांच्या सूचना मागवल्या. १५ लाखांहून अधिक लोकांनी याबाबत सूचना पाठवल्या आहेत. येणाऱ्या २५ वर्षांत भारत कसा पाहिजे यावर नागरिकांचे निवेदन घेतलं आहे. विविध विद्यापीठ, संस्थांना एकत्रित केलं. १५-२० लाख लोकांनी यावर अहवाल दिला. मग एआयच्या मदतीने त्याचं विभाजन केलं', असं मोदी म्हणाले.

'विभाजनानंतर प्रत्येक विभागात अधिकाऱ्यांची टीम पुढील २५ वर्षांसाठी बनवली. अधिकाऱ्यांकडून या कामासाठी मी प्रेझेंटनेश घेतलं. प्रत्येक विभागावर दोन-अडीच तास चर्चा केली. मला वाटतं की मी हे काही कागदपत्र बनवतो आहे, हे व्हिजन मोदींची पोपटपंची नाहीय. १५-२० लाख लोक इन्पुट देत आहे म्हणजे संपूर्ण देशाचा यात समावेश आहे', असंही ते म्हणाले.

'निवडणूक झाल्यानंतर हा अहवाल राज्यांना पाठवला जाणार. मग राज्यात यासंदर्भात चर्चा होईल. राज्यातून अहवाल आल्यानंतर यावर निती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांबरोबर व्यापक चर्चा होऊन अंतिम निर्णय होईल', असं मोदींनी स्पष्ट केलं.

'मी तीन विभागात याचं नियोजन केलं आहे. २५ वर्षांचं नियोजन, मग पाच वर्षांचं आणि पुढील शंभर दिवसांचं वेळापत्रक बनवून अधिकाऱ्यांना पाठवलं आहे. २०१९ मध्येही निवडणुकीत उतरण्याआधी मी अधिकाऱ्यांना १०० दिवासांसाठी कामाला लावलं होतं. निवडणुका संपल्यानंतर मी पुन्हा कार्यरत झाल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत मी कलम ३७० हटवला, मग तीन तलाक कायदा रद्द केला, बँकांचं एकत्रितकरण, प्राण्यांचं लसीकण केलं', असं मोदी म्हणाले.

# धोकादायक इमारतींना लवकरच नोटिसा, मनपाची कारवाई



**मुंबई (प्रतिनिधी):** महापालिकेच्या 'डी' विभागातील ग्रॅन्ट रोड व चर्नी रोड स्थानक परिसरातील धोकादायक इमारतींच्या मालकांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत. याद्वारे योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना इमारत आणि कारखाने विभागाला उपायुक्त डॉ. संगीता हसनाळे यांनी दिल्या आहेत. रेल्वे रूळांलगत असलेल्या सांडपाणी वाहिन्यांची स्वच्छता करून परिसरातील कचरा, राडारोडा उचलावा जेणेकरून पाणी वाहण्यास अडथळा होणार नाही, अशाही सूचना त्यांनी पालिका अधिकाऱ्यांना रविवारी दिल्या. पावसाळ्यात गैरसोय होऊ नये म्हणून पालिका प्रशासन विविध उपाययोजना करत असून, यंदा देखील पावसाळापूर्व कामांचा निपटारा करण्यासाठी पालिका प्रशासन कामे करत आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# 'बिनशर्त पाठिंबा पक्षासाठीच', मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची स्पष्टोक्ती

■ मुंबई: यश सावंत

**'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे काम पाहून त्यांना आणि महायुतीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला, तो पक्षाचा विचार करून घेतला आहे. ज्यांना हे समजत नसेल त्यांनी त्यांना हवा तो निर्णय घ्यावा', असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी स्पष्ट केले आहे.**

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासंबंधी आमच्या पक्षातील कोणाशी संपर्क करायचा, याची यादी लवकरच पक्षाकडून संबंधितांना कळवली जाईल. पण माझ्या सहकाऱ्यांना या उमेदवारांनी मानानेच वागवले पाहिजे, अशा इशाराही राज यांनी दिला आहे. गुढीपाडव्याच्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देत असल्याची घोषणा केली. त्यानंतर शनिवारी ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. बैठकीनंतर ठाकरे यांनी भूमिका स्पष्ट केली. 'भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी आमच्या पक्षातील कुणाशी प्रचारासंबंधी संपर्क करायचा आहे याची यादी लवकरच पक्षाकडून संबंधितांना कळवली जाईल. त्यांनी त्यांच्याशीच संपर्क करावा. ज्या उमेदवारांचा प्रचार माझ्या पक्षातील सहकाऱ्यांकडून करण्यात येईल त्यांना या उमेदवारांनी मानानेच वागवले पाहिजे', असा इशारा ठाकरे यांनी यावेळी दिला. प्रचारासाठी सभा घ्यायच्या, कुठे घ्यायच्या याचा निर्णय चर्चेअंती घेतला जाईल, असे ठाकरे यावेळी म्हणाले.

'२०१४-२०१९ या काळात, मी नरेंद्र मोदी सरकारवर जी टीका केली, ती व्यक्तिगत नव्हती. ती मुद्द्यांवरची टीका होती. गेल्या ५ वर्षांत ज्या चांगल्या गोष्टी मोदी सरकारने केल्या, त्याचे कौतुकही मी केले होते. काश्मीरमधून ३७० कलम हटवल्यावर, अयोध्येत राम मंदिर उभारल्यावर त्याचे कौतुक पण मीच केले होते. धर्माच्या आधारावर आपल्याला राष्ट्र उभे करायचे नाही. परंतु १९९२ पासून २०२४ पर्यंत राम मंदिर उभारणी रखडली होती. २०२४मध्ये ते उभे राहिले याचा मला निश्चित आनंद आहे आणि कौतुक पण मी केले', असेही ठाकरे म्हणाले. '१९९२च्या आंदोलनावेळी कारसेवकांना घातलेल्या गोळ्या, कारसेवकांची शरयू नदीत वाहणारी प्रेते ही दृश्य नागरिकांनी टीव्हीवर पाहिली होती. राम मंदिरासाठी कारसेवकांनी आयुष्याची आहुती दिली. इतक्या त्यागानंतर मंदिर उभे राहिले त्याबद्दल मला प्रचंड आनंद आहे. जरी राम मंदिराचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला असला तरी जर नरेंद्र मोदी पंतप्रधान नसते, तर हे राम मंदिर उभेच राहिले नसते', असे विधानही ठाकरे यांनी केले. एनआरसीचा विषय असेल, ३७० कलमाचा विषय असेल मोदी पंतप्रधान नसते, तर हे विषय प्रलंबितच राहिले असते, असेही ते म्हणाले.



## कोस्टल रोड ते सी-लिंकला जोडणार महाकाय गर्डर; दोन हजार टनांच्या 'बो आर्क गर्डर'ची दोन दिवसांत जोडणी

■ मुंबई: रघुवीर जाधव

मुंबईतील कोस्टल रोडवरून थेट वरळी सी-लिंकवर प्रवास करता यावा, यासाठी प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. वरळी सी-लिंकला जोडण्यासाठी पिलर ७ आणि ९ च्या मध्ये देशातील सर्वात मोठा आणि ३० बोइंग जेट वजनाइतका दोन हजार टनांचा 'बो आर्क गर्डर' २ ते ३ दिवसांत बसवण्यात येणार आहे.

कोस्टल रोड प्रकल्पातील हा सर्वात आव्हानात्मक टप्पा असून, अरबी समुद्रात भरती व ओहोटीचा ताळमेळ राखत ते काम केले जाणार आहे. संपूर्ण स्टील बनावटीचा असलेला हा गर्डर पुढील १०० वर्षे टिकेल इतका मजबूत असल्याचे पालिकेने सांगितले.

प्रियदर्शनी पार्क ते वरळीदरम्यान कोस्टल रोड मे अखेरपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी वेगाने काम सुरू आहे. कोस्टल रोड आणि वांद्रे-वरळी सी-लिंक जोडण्यासाठी दोन हजार टन वजनाचा गर्डर बसविण्यात येणार आहे. १३६ मीटर लांब असलेल्या या गर्डरमुळे कोस्टल रोड आणि वांद्रे-वरळी सी-लिंक अंतर जोडले जाणार असून दक्षिणेकडील बाजूच्या चार लेन सज्ज होतील.



या गर्डरचे फॅब्रिकेशन अंबाला येथे झाल्यानंतर तो रस्ता मार्गे न्हावा गावात आणण्यात आला. तेथे त्याचे पुढील काम करण्यात आले असून, आता तो तयार झाला आहे. माझगाव जेट्टीवरून मोठ्या बार्जच्या मदतीने आता हा गर्डर वरळी येथे आणण्यात येत आहे. तेथे असलेल्या खांबावर तो अलगदपणे ठेवण्याचे काम केले जाणार आहे.

कोस्टल रोड आणि सी लिंकदरम्यान तयार होणाऱ्या पुलाचे अंतर ८५० मीटर रुंद आणि २७० मीटर रुंद आहे. त्यामुळे वरळी येथे कोस्टल रोडला सी-लिंकची कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. त्यामुळे वांद्रे येथून दक्षिण मुंबईत येणाऱ्या वाहनांना सध्या सी लिंक वरळीला जिथे संपतो तिथे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार नाही.

## महाराष्ट्रावर जलसंकट! प्रमुख धरणांमध्ये ३४.१० टक्केच पाणी शिल्लक, टँकरची संख्या २ हजारांवर

■ मुंबई: सचिन कदम

राज्यातील पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होऊ लागला आहे. जलसंपदा विभागाने शुक्रवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठा अवघ्या ३४.१० टक्क्यांवर आला आहे. गेल्यावर्षी याच दिवशी हा साठा ४२.०९ टक्के होता. छत्रपती संभाजीनगर येथील धरणांमध्ये केवळ १८.३१ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने परिस्थिती खूपच बिकट बनली आहे. या स्थितीमुळे टँकरने पाणीपुरवठा करणारी गावे आणि वाड्यांची संख्या वाढली असून, राज्यभरात सध्या दोन हजार ९३ टँकरने पाणीपुरवठा सुरू असल्याचे गंभीर वास्तव आहे.

टँकरने राज्यातील विविध गावे आणि वाड्यांमध्ये सुरू असलेल्या पाणीपुरवठाबाबतचा अहवालही राज्य सरकारने जाहीर केला. त्यानुसार शुक्रवारपर्यंत एकूण एक हजार ६६५ गावे आणि तीन हजार ९९९ वाडे आता पाण्यासाठी टँकरवर विसंबून आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा टँकरची गरज तब्बल २८ पटीने वाढल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. राज्यात २२ जिल्ह्यातील एक हजार ६६५ गावे आणि तब्बल तीन हजार ९९९ वाड्यांची तहान भागविण्यासाठी दोन हजार ९३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यात खासगी टँकरची संख्या दोन हजार चार, तर शासकीय टँकरची संख्या ८९ इतकी नोंदविण्यात आली आहे. धरणांमधील पाणीसाठा लक्षात घेता राज्यातील सर्व मोठे प्रकल्प, मध्यम, प्रकल्प आणि महाराष्ट्र राज्य प्रकल्प अशा सर्व प्रमुख धरणांमध्ये शुक्रवारपर्यंत ३४.१० टक्के पाणीसाठा शिल्लक होता. त्यातील एकूण १३८०६.२४ दक्षलक्ष घनमीटर इतकाच पाणीसाठा उपयुक्त असल्याचे कळते. यात नागपूर येथे ४५.१६ टक्के, अमरावती ४२.४८ टक्के, छत्रपती संभाजीनगर येथे १८.३१ टक्के, नाशिक येथे ३५.२५ टक्के, पुणे येथे ३१.६७ टक्के आणि कोकणात ४१.०७ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.



## उष्माघाताचा सामना करण्यासाठी आपला दवाखानाही सज्ज, १०३ दवाखान्यांमध्ये वातानुकूलनबरोबरच कुलरची व्यवस्था

■ मुंबई: संजीनी खाडे

महाराष्ट्रासह देशातील ११ राज्यांमध्ये उन्हाचा पारा वाढणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यासाठी मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या




सर्व रुग्णालयांमध्ये दोन खाटा असलेले शीतकक्ष उभारले आहेत. नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाही महानगरपालिकेने सज्ज केले आहेत. मुंबई महानगरपालिकेने वैद्यकीय महाविद्यालयांबरोबरच १४ रूग्णालयात उष्माघात बाधित रूग्णांसाठी दोन रुग्ण खाटा शीत कक्ष कार्यरत केले आहेत. तसेच प्रशिक्षित कर्मचारीही नेमले आहेत.


तसेच मुंबई महानगरपालिकेने २५० पैकी १०३ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांमध्येही वातानुकूलित व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. रुग्णांना थंड वातावरण उपलब्ध व्हावे यासाठी आपला दवाखानामध्ये वातानुकूलन यंत्रणेबरोबरच कूलरची व्यवस्था करण्यात आली आहे.

## अतिवेगवान प्रवासासाठी जुलैपर्यंत प्रतीक्षा, सांताक्रूझ चेंबूर जोडरस्ता विस्तारीकरण प्रकल्प लांबणीवर

■ मुंबई: संजीनी खाडे

अमर महल – सांताक्रूझ, पश्चिम द्रुतगती मार्ग असा थेट सिग्नलमुक्त आणि अतिवेगवान प्रवास करण्यासाठी प्रवाशांना आता जुलैपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. सांताक्रूझ – चेंबूर जोडरस्ता विस्तारीकरण प्रकल्पातील वाकोला नाला – पानबाई इंटरनॅशनल स्कूल उन्नत रस्त्याचे काम एप्रिलमध्ये पूर्ण होईल, असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) जाहीर केले होते. पण एप्रिलचा मुहूर्त टळला असून आतापर्यंत या प्रकल्पाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित पाच टक्के काम पूर्ण होण्यासाठी जुलै महिना उजाडणार आहे. त्यामुळे जुलैअखेरीस उन्नत रस्त्याचे काम पूर्ण करून हा रस्ता वाहतूक सेवेत दाखल करण्यात येण्याची शक्यता आहे.

सांताक्रूझ – चेंबूर जोडरस्ता विस्तारीकरणातील कपाडिया नगर – वाकोला दरम्यान उन्नत रस्ता बांधण्यात येत आहे. ६०० कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येणाऱ्या या रस्त्यातील कपाडिया नगर – वाकोला नाला दरम्यान



३ किमी लांबीचा उन्नत रस्ता पूर्ण झाला आहे. मात्र याच रस्त्यातील एक महत्त्वाचा भाग असलेल्या २१० मीटर केबल स्टे पुलाचे आणि त्या पुढील ५०० किमी उन्नत रस्त्याचे अर्थात वाकोला नाला – पानबाई स्कूल उन्नत रस्त्याचे काम शिल्लक आहे. वाकोला नाला – पश्चिम द्रुतगती मार्गावरील सध्याच्या उड्डाणपुलावरून केबल स्टे पूल जाणार आहे. पुढे ही मार्गिका पानबाई स्कूलपर्यंत सध्याच्या उड्डाणपुलाला समांतर जाणार आहे. हा उन्नत रस्ता पूर्ण झाल्यास अमर महल – सांताक्रूझ, पश्चिम द्रुतगती मार्गादरम्यानचे अंतर अवघ्या काही मिनिटांत पार करता येणार आहे.

सांताक्रूझ – चेंबूर जोडरस्ता विस्तारीकरणाचे काम अत्यंत संथगतीने करण्यात आले. हा प्रकल्प याआधीच पूर्ण होणे अपेक्षित होते. कंत्राटदाराच्या दिरंगाईची अखेर एमएमआरडीएने गंभीर दखल घेतली. काही दिवसांपूर्वीच याच उन्नत रस्त्याच्या कामास विलंब केल्याप्रकरणी कंत्राटदार जे. कुमार कंपनीला अडीच कोटी रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

## वायकर यांच्या उमेदवारीचा महायुतीत अजूनही तिढा

■ मुंबई: माधव अलवा

उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून उद्धव ठाकरे गटाचे अमोल कीर्तिकर यांना तोडीस तोड उमेदवार म्हणून शिंदे गटाने रवींद्र वायकर यांना उमेदवारी देण्याचे जवळजवळ निश्चित झाले आहे; मात्र भाजपच्या स्थानिक नेत्यांनी त्यांच्या उमेदवारीला विरोध केल्याने नवा पेच निर्माण झाला आहे. भाजप आणि शिंदे गट हा तिढा कसा सोडवणार, याकडे या मतदारसंघातील सर्वांचे लक्ष लागले आहे.

उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघात महायुतीची उमेदवारी कोणाला मिळणार, याची प्रतीक्षा सर्वांना होती. अखेर महायुतीने हा मतदारसंघ शिंदे गटाला सोडल्याने तेथे रवींद्र वायकर यांना उमेदवारी देण्याचे जवळजवळ निश्चित झाले आहे. येथून अभिनेते गोविंदा, सचिन खेडेकर, शरद पोंक्षे, सचिन पिळगावकर यांच्या नावांची चर्चा होती. आता शिंदे गटाने वायकर यांना उमेदवारी देण्याचे निश्चित केले आहे. वायकर यांची चौकशी सुरू असल्याने, त्यांना या मतदारसंघातून उमेदवारी देऊ नये, अशी आक्रमक भूमिका भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे वायकरांच्या उमेदवारीबद्दल भाजपने प्रश्नचिन्ह निर्माण केल्याने शिंदे गटाची डोकेदुखी वाढली आहे. अमोल कीर्तिकर हे शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार आणि त्यांचे वडील गजानन कीर्तिकर हे शिंदे गटाचे नेते आहेत. कीर्तिकर



यांना उमेदवारी दिली असती, तर मुलगा विरुद्ध वडील अशी थेट लढत येथे झाली असती; मात्र गजानन कीर्तिकर यांनी माघार घेतल्यामुळे येथे महायुतीचा उमेदवार कोण, असा प्रश्न निर्माण झाला होता. शिंदे गटाकडून रवींद्र वायकर यांची उमेदवारी अधिकृतपणे जाहीर झाल्यास शिंदे गटाचे नेते गजानन कीर्तिकर यांना या मतदारसंघातून वायकर यांचा प्रचार करावा लागेल. अर्थातच हा प्रचार अमोल कीर्तिकर यांच्याविरोधात गजानन कीर्तिकर यांना करावा लागेल.

## गोखले-बर्फीवाला पुलाची जोडणी अखेर सुरू; जूनअखेरपर्यंत पूल खुले करण्याचे प्रयत्न

■ मुंबई: सम्यक कासारे

अंधेरीतील गोखले उड्डाणपूल आणि बर्फीवाला पुलाच्या जोडणीला अखेर रविवारी सुरुवात झाली. 'आयआयटी मुंबई'ने ८ एप्रिल रोजी या जोडणीच्या संरेखनाचा अंतिम अहवाल सादर केला होता. त्यानुसार या जोडणीसाठी चारऐवजी दोन स्तंभ उंचावण्यात येणार आहेत. त्यामुळे पूल जोडणीचा कालावधी कमी होऊन तो लवकर खुला करण्यासाठी प्रयत्न केले जातील. येत्या जूनअखेर दोन्ही पुलांची जोडणी करून ते वाहतुकीसाठी सुरू करण्याचा पालिकेचा प्रयत्न असणार आहे. आमदार अमित साटम यांच्या माहितीनुसार, सध्या काम करणाऱ्या कंत्राटदाराकडूनच नवीन काम केले जाणार आहे. गोखले-बर्फीवाला पुलाच्या उत्तरेकडील जोडणीसाठी तीन ते चार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. सुरुवातीला पालिकेकडून या पुलाच्या पृष्ठभागाचे काम सुरू करण्यात आले आहे. तर, उत्तरेकडील पुलाच्या संपूर्ण जोडणीचे काम पूर्ण करण्यासाठी ६० ते ९० दिवसांचा कालावधी लागणार असल्याचे पालिका अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

गोखले पुलाच्या पुनर्बांधणीत,



बर्फीवाला पुलाला गोखले पूल जोडून जुहूपर्यंतच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवला जाणार होता. मात्र, काही अभियांत्रिकी दोषांमुळे गोखले पुलाची उंची २.८ मीटरने अधिक वाढल्याने दोन पूल जोडण्याचा प्रयत्न फसला. या पार्श्वभूमीवर पालिकेने या समस्येवर उपाय सुचवण्यासाठी 'आयआयटी' व 'व्हीजेटीआय'चा सल्ला मागितला होता. त्यानुसार पूल जोडणीसाठी आता उत्तरेकडचे काम सुरू करण्यात आले आहे. दुसऱ्या गर्डरसाठीचे साहित्य हळूहळू पोहोचत आहे. दुसऱ्या बाजूच्या गर्डरसाठी लागणाऱ्या ३२ स्पॅन पैकी जवळपास ५ स्पॅन मुंबईत पोहोचले असून आता त्यांचे एकत्रीकरण करून कामाला सुरुवात केली जाणार आहे. मात्र, उत्तरेप्रमाणेच दक्षिण बाजूला देखील जोडणीची हीच समस्या पुढे येणार आहे. त्यासाठी पालिका काय करत आहे? तिथेही मार्गिका खुली केल्यानंतर जोडणीचे काम हाती घेणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

## शिवसेना ठाकरे गटातील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

■ मुंबई: नितीन देवळेकर

उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार पियुष गोयल यांच्या कार्यकर्ता संकल्प मेळाव्यात उद्धव ठाकरे गटातील शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

कांदिवली पूर्वेच्या आकुर्ली रोड येथे आयोजित या मेळाव्यात खासदार गोपाळ शेट्टी, कांदिवली पूर्वचे आमदार अतुल भातखळकर, कॅप्टन अभिजित अडसूळ आदी घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचे उपशाखाप्रमुख अमोल शिंदे, कीर्ती ढाले, राशी दागलिया आदी कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मुंबईत



व महाराष्ट्रात आलेले मुंबई मेट्रो, समृद्धी महामार्ग, अटल सेतू, कोस्टल रोड, नवी मुंबई विमानतळ आदी सर्व विकासप्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे मार्गी लागले. झोपडपट्ट्यांमधील रहिवासी, मध्यमवर्गीय, व्यापारी, महिला, युवक, विद्यार्थी, कामगार अशा प्रत्येक समाजघटकासाठी मोदी यांनी काम केले आहे, असे भातखळकर यांनी यावेळी सांगितले. देशाने केलेल्या प्रगतीत महाराष्ट्र आणि मुंबईचे योगदान मोठे आहे. उत्तर मुंबई ही उत्तम मुंबई करण्यासाठी येथून पंतप्रधान मोदी यांना मतदारांनी आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन गोयल यांनी केले.

## म्हाडाकडून देकारपत्राची रखडपट्टी

■ मुंबई: नितीन देवळेकर

वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या रहिवाशांच्या नशिबी घरघर कायम आहे. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने संक्रमण शिबिरातील रहिवाशांना हक्काचे घर देण्यासाठी डिसेंबरमध्ये मास्टर लिस्टमधील रहिवाशांची पहिली संगणकीय सोडत काढली; मात्र सोडतीचा निकाल जाहीर होऊन चार महिने उलटूनही विजेत्यांना अद्याप देकारपत्र देण्यात आली नाहीत.

म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने २८ डिसेंबरला मास्टर लिस्टवरील २६५ भाडेकरू आणि रहिवाशांची पहिल्यांदाच संगणकीय सोडत काढली होती. संगणकीय सोडतीनंतर अर्जदाराने १५ दिवसांच्या आत उपमुख्य अधिकारी, पुनर्रचित गाळे विभाग यांच्याकडे स्वीकृती पत्र सादर करणे; तसेच ४५ दिवसांच्या आत ताबा घेणे बंधनकारक होते; अन्यथा कोणतीही पूर्वसूचना न देता सदनिकेचे वितरण रद्द केले जाईल, असे म्हाडाने स्पष्ट केले. मात्र सोडत जाहीर होऊन चार महिने उलटूनही म्हाडाकडूनच विजेत्यांना अद्याप देकारपत्र देण्यात आले नाहीत. त्यामुळे सोडतीत विजयी झालेल्या संक्रमण शिबिरात राहणाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत म्हाडाकडे विचारणा केली असता काही अर्जदारांनी खोटी कागदपत्रे सादर केल्याची तक्रार म्हाडाला प्राप्त झाली आहे. त्यामुळे सोडतीमधील सर्व



विजेत्यांची पुन्हा पात्रता पडताळणी करण्याचा निर्णय मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने घेतला आहे. सध्या पडताळणीचे काम अंतिम टप्प्यात असून ते पूर्ण झाल्यानंतर देकारपत्र पाठवली जाणार असल्याचे म्हाडाकडून सांगण्यात आले.

पुनर्रचित इमारतींमध्ये नवीन गाळ्यांचे मालकी तत्त्वावर वितरण करण्यात येते. अरुंद भूखंड किंवा आरक्षणांमुळे भूखंड बाधित झाले असल्यास जुन्या इमारतींच्या ठिकाणी पुनर्रचित इमारत बांधणे शक्य होत नाही. अशा बाधित इमारतींच्या रहिवाशांना मास्टरलिस्ट समितीद्वारे जाहिरात देऊन अर्ज मागविले जातात व पात्र रहिवाशांना मास्टर लिस्टमध्ये समाविष्ट करून इतरत्र पुनर्रचित इमारतींमधील अतिरिक्त गाळ्यांचे वाटप मालकी तत्त्वावर केले जाते.

# शिवसेनेला नकली म्हणणाऱ्यांची शैक्षणिक पदवी नकली, उद्धव ठाकरे यांचे आरोपाला प्रतिउत्तर

**पालघर: सचिन कदम**

शिवसेनाप्रमुखाने स्थापन केलेल्या शिवसेनेला नकली म्हणणाऱ्या भाजपाच्या नेत्यांची शैक्षणिक पदी (डिग्री) नकली असल्याचे प्रतिउत्तर उद्धव ठाकरे यांनी बोईसर येथे दिले. देश हुकूमशाही कडे वाटचाल करत असताना देशाची मजबुती कायम ठेवण्यासाठी इंडिया आघाडीच्या माध्यमातून संमिश्र सरकार आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. तसेच महा विकास आघाडी प्रणित इंडिया सरकार सत्तेत आल्यास वाढवण बंदर कायमचे रद्द करून पालघर जिल्ह्यात चांगले उद्योग आणून विकास साधला जाईल असे त्यांनी आश्वासन दिले.

महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ बोईसर (पास्थळ) येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला खासदार संजय राऊत, आमदार विनोद निकोले, आमदार सुनील भुसारा, कम्युनिस्ट पक्षाचे डॉ. अशोक ढवळे, आदिवासी एकता परिषदेचे काळूराम धोदडे तसेच महा विकास




आघाडी घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. वाढवण बंदरामुळे नेमका कोणाचा विकास होणार आहे असा सवाल उपस्थित करत मोदी परिवार सांगणाऱ्या पंतप्रधान यांनी जनतेशी आपले नाते जपावे असा सल्ला दिला. दोन व्यक्तींचा हा परिवार सूटबुटातील मित्रांचे हित जपतो अशी टीका केली. पोलिसांचा मोठा फौजफाटा लावून वाढवण बंदरा संदर्भात जन सुनावणी पार पडल्याचे सांगत ते पुन्हा निवडून आले तर रणगाडे घेऊन हे बंदर उभारणी साठी प्रयत्न करतील असे उपस्थित नागरिकांना सांगत भाजपाला गाडण्याची हीच वेळ असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. निसर्गरम्य समुद्र किनारा व जव्हार सारखे पर्यटन स्थळ लाभलेल्या पालघर जिल्ह्याचा विकास साधण्यासाठी जिल्ह्याचे वैशिष्ट्य राखून रोजगार निर्मिती केली जाईल असे सांगितले. तसेच पर्यटन विकासाच्या दृष्टिकोनातून विमानतळ, उद्योग आणले जातील असे ते म्हणाले. मोदी सरकारने चांगले उद्योग गुजरात मध्ये देऊन विध्वंस करणारे उद्योग महाराष्ट्र मध्ये आणण्याचे सांगत यापुढे केंद्र सरकारला महाराष्ट्राच्या हक्काचे ओरबाडायला दिले जाणार नाही असे ठणकावून सांगितले. सध्या भाजपाच्या स्थितीबद्दल टिपणी करताना अस्सल भाजप कोणता असा सवाल उपस्थित करत उपऱ्याची भरती केल्याचे त्यांनी लक्ष वेधले. भाजपा हा पक्ष भाडखाऊ, भेकड व भ्रष्ट असल्याचे आरोप करत पालघर मधून यापुढे गद्दारांना गुजरात मध्ये जाऊ देणार नाही असे सांगितले.

## मुंबईजवळील 'हे' गाव आजही पाहतेय सुविधांची वाट, आजही पाणी, वीज अन् रस्त्यापासून वंचित

**ठाणे: तृप्ती गोरे**

एकीकडे विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञेच्या (एआय) प्रगतीचे गोडवे गायले जात असतानाच, दुसरीकडे ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील सावरकूट या गावात अगदी मूलभूत सुविधाही पोहोचल्या नसल्याचे वास्तव आहे. पाणी, वीज, रस्ते, शिक्षण आणि आरोग्यसेवेपासून येथील रहिवासी अद्यापही कोसो दूर आहेत.



मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांचा तालुका म्हणून शहापूरची ओळख असली तरी सर्वाधिक तहानलेली गावे इथेच असल्याचे सातत्याने समोर येते. मध्य वैतरणा धरणाच्या पायथ्याशीच वसलेल्या सावरकूटमधील रहिवाशांना उन्हाळयात पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. गावाच्या आसपासच्या वस्त्यांमध्ये पाणीटंचाईचे दुर्भिक्ष कायम आहे. इतर मूलभूत सुविधाही इथे पोहोचलेल्या नाहीत. एका सामाजिक संस्थेने या आदिवासी पाड्यासाठी सौरऊर्जेचा आधार दिला असला तरी ही तात्पुरती सोय किती दिवस पुरणार, असा प्रश्न येथील रहिवाशांकडून विचारला जातो. आरोग्याच्या अपुऱ्या सुविधांमुळे येथील गर्भवती महिलांना झोळीत टाकून वैतरणा येथील पूल ओलांडून मोखाड्यातून मोठा वळसा घालून कसारा प्राथमिक आरोग्य केंद्रात न्यावे लागते.

सावरकूट वस्ती आजनूप ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये येते. १०० लोकसंख्येच्या या गावात अंगणवाडी, शाळा, आरोग्य केंद्र नाही. शेतीतून येणाऱ्या उत्पन्नांवर येथील ग्रामस्थांचा चरितार्थ चालतो. शिक्षणसुविधा नसल्यामुळे गावातील तरुणांना चांगल्या नोकऱ्या मिळत नाहीत. परिणामी त्यांना शहरातील हॉटेल, हाऊसकीपिंग यांसारख्या दुय्यम नोकऱ्यांवर समाधान मानावे लागते. गावातील काही विद्यार्थी काही अंतरावर असलेल्या शिरोळ आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेतात. परंतु, अंगणवाडीमध्ये शिक्षण पुरेसे मिळत नसल्यामुळे पुढील शिक्षणात अडचणी येत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

## ठाण्यात बेकायदा बांधकामांवर कारवाई, ठाणे महापालिका आयुक्तांचे अधिकाऱ्यांना आदेश

**ठाणे: तृप्ती गोरे**

**महापालिका क्षेत्रात नैसर्गिक आपत्ती निवारण आणि नागरिकांची जीवितहानी टाळण्याच्या दृष्टीकोनातून बेकायदा बांधकामे हटवण्याची मोहीम १५ एप्रिल पासून पुन्हा सुरू करण्याचे आदेश आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीत दिले. तसेच धोकादायक इमारती रिक्त करण्यासाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या व्यवस्थेसाठी प्रमाणित कार्य पद्धती तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.**

ठाणे महापालिका क्षेत्रात बेकायदा बांधकामे सुरू असल्याच्या मुद्द्यावरून पालिका प्रशासनावर टीका होत असून याच मुद्द्यावरून आयुक्त सौरभ राव यांनी नाराजी व्यक्त करत बेकायदा बांधकामे रोखण्यासाठी जीपीएस सेटेलाईट प्रणालीचा वापर करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यापाठोपाठ त्यांनी आता मुंब्रा प्रभाग समिती कार्यालयात घेतलेल्या बैठकीत बेकायदा बांधकामे हटवण्याची मोहीम १५ एप्रिल पासून पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले. मुंब्रा येथील एकूण ६६ धोकादायक इमारतीबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. या इमारतींची सहायक आयुक्त आणि कार्यकारी अभियंता यांच्या टीमने तातडीने पाहणी करावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी बैठकीत दिले. ज्या इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे अहवाल परस्पर विरोधी आले आहेत. त्या इमारतींची पाहणी ते दोन्ही स्ट्रक्चर ऑडिटर आणि महापालिकेने नियुक्त केलेले त्रयस्थ ऑडिटर यांनी संयुक्तपणे करून अहवाल द्यावा. येत्या काही दिवसात




ही कार्यवाही पूर्ण करावी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. जे स्ट्रक्चर ऑडिटर दिशाभुल करणारा अहवाल देतील, त्याच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार येणारा पावसाळा हा नेहमीपेक्षा वेगळ्या धाटणीचा असण्याची शक्यता आहे. कमी काळात मोठा पाऊस असे त्याचे स्वरूप असू शकेल. त्यांची वारंवारताही अधिक असेल.

हे लक्षात घेऊन आपत्कालीन व्यवस्थापन करावे लागणार आहे. त्यामुळे, विशेष करून मुंब्रा भागात पर्यायी निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, वाहतूक व्यवस्था यांचे तपशीलवार नियोजन करावे. त्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करावा, स्वयंसेवी संस्थांचे नेटवर्क, खाजगी बांधकाम व्यवसायिकांची यंत्र सामुग्री यांची माहिती घ्यावी. काळजी घेणे आणि तत्काळ प्रतिसाद देणे हे आपल्या हाती आहे.

ते आपण काटेकोरपणे करावे, असेही आयुक्त राव यांनी सांगितले. मुंब्रा आणि दिवा प्रभाग समिती यांची प्रस्तावित नवीन कार्यालये, देसाई खाडी पूल, त्यांचे पोहचमार्ग, दिवा रेल्वे उड्डाणपूल, दिवा येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालय, नाल्याची कामे, जलकुंभ आदी कामाची आयुक्त राव यांनी विस्तृत माहिती घेतली.

## ठाण्यातील तलावांच्या संवर्धनाला सुरूवात

**ठाणे: तृप्ती गोरे**

तलावांचे शहर म्हणून ओळख असलेल्या ठाणे शहरातील तलावांच्या संवर्धनाचे कार्य ठाणे महापालिकेने स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे. गेल्याकाही दिवसांपासून ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील तलावाचे संवर्धन सरू आहे. व्यवसायिक सामाजिक जबाबदारीतून (सीएसआर) निधीतून या तलावाचे संवर्धन केले जात आहे. पहिला प्रकल्प म्हणून ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील तलावाच्या निर्माणाचे कार्य संस्थेने हाती घेतले आहे. अनेकजण या तलावामध्ये निर्माल्य फेकत होते. तसेच कचरा देखील



टाकला जात होता. तलावातील पाणी देखील दुषित झाले होते. त्यामुळे तलाव परिसरात मोठ्याप्रमाणात दुर्गंधी पसरत होती. या परिसरातून अनेक वाहने जात असतात. त्यामुळे वाहन चालकांना देखील त्रास सहन करावा लागत होता. तलावात देखील मोठ्याप्रमाणात गाळ साचला होता. यामुळे तलावातील खोली कमी झाली होती. हा तलाव केवळ १० फूट खोल होता. प्रदूषित पाण्यामुळे जलचरांवर देखील त्याचा परिणाम होत असल्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

या तलावात पक्ष्यांसाठी 'बर्ल्ड लँड' तयार करणे, तलावाची खोली वाढविणे, प्रदूषित पाणी काढणे अशी कामे केली जात आहेत. या तलावाचे काम पूर्ण झाल्यानंतर आणखी सहा ते सात तलावांचे संवर्धन केले जाणार आहे. ठाणे शहराला तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते. तलाव संवर्धनासाठी तत्कालीन आयुक्त अभिजीत बांगर यांच्या सूचनेनुसार तलाव संवर्धनाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार ग्रीन यात्रा या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून

## बालाजी मंदिर भूखंडाविरोधात याचिका, २५ एप्रिलला सुनावणी; सिडकोचा हरकतीचा मुद्दा फेटाळल्याचा दावा

**उरण: दिगंबर जाधव**

उलवे नोडच्या किनाऱ्यावर सिडकोने तिरुपती व्यंकटेश्वर स्वामी मंदिरासाठी दिलेल्या भूखंडाच्या सीआरझेड मंजुरीला आव्हान देणारी याचिका पर्यावरणवाद्यांकडून हरित न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर २५ एप्रिलला सुनावणी करण्यात येणार आहे. त्या वेळी याचिका स्वीकारणार की नाही ते स्पष्ट होणार आहे. मात्र याचिका दाखल करण्यात आल्यानंतर सिडकोने मुदतीत हरकत न नोंदविल्याचा तांत्रिक मुद्दा उपस्थित केला होता. तो न्यायालयाने फेटाळला असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

सिडकोने मंदिरासाठी दिलेला ४० हजार चौरस मीटरचा भूखंड सीआरझेड



प्रतिबंधित क्षेत्रात येतो आणि महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटीने (र्ऍईई) सिडकोने भाडेतत्त्वावर दिलेल्या भूखंडाची महत्त्वाची माहिती विचारात घेतली नसल्याचा आक्षेप घेत नॅटकनेक्टचे संचालक बी एन कुमार यांनी सिडकोच्या सीआरझेडच्या मंजुरीला न्यायालयात आव्हान दिले आहे.

अर्जदाराने ३० दिवसांच्या आत हरित न्यायालयात जाणे आवश्यक होते असा युक्तिवाद सिडको आणि 'एमएमआरडीए'ने केला होता. त्याला नॅटकनेक्टचे वकील रोनिता भट्टाचार्य यांनी 'एमसीझेडएमए'चा अंतिम होकार सार्वजनिक डोमेनमध्ये नसल्याचे निदर्शनास आणून दिले. शिवाय, ही माहिती 'एमसीझेडएमए'ने या वर्षी जानेवारीमध्ये न्यायाधिकरणाला मंजुरीचे पत्र सादर केले तेव्हाच अर्जदाराच्या लक्षात आले असल्याचे स्पष्ट केले. या वेळी हरित न्यायालयाच्या खंडपीठाने – न्यायिक सदस्य म्हणून न्यायमूर्ती दिनेश कुमार सिंग आणि तज्ज्ञ सदस्य म्हणून डॉ. विजय कुलकर्णी यांनी अंतिम सीआरझेड मंजुरीही जानेवारीमध्ये जनतेला कळवण्यात आली होती. त्यामुळे त्यांनी विलंब माफ करीत याचिका स्वीकारासाठी २५ एप्रिल ही तारीख देण्यात आली आहे.

## उरण-पनवेल मार्गाच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव, नवघर फाटा ते बोकडवीरा पोलीस चौकीपर्यंत चौपदरी मार्ग

**पनवेल: सतिश सोनावणे**

तालुक्यातील प्रमुख मार्ग असलेल्या उरण-पनवेल या राज्य महामार्गाचे सिडकोच्या माध्यमातून रुंदीकरण करण्यात येणार आहे. त्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असल्याची माहिती सिडकोकडून देण्यात आली आहे. उरणमधील वाढत्या नागरी व औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्या आणि वाहनांतही अनेक पटीने वाढ झाली आहे. त्यामुळे या मार्गावरील अपघातांतही वाढ झाली आहे. त्यामुळे जुना नवघर फाटा ते उरणच्या कोटनाका दरम्यानच्या रस्त्याच्या रुंदीकरणाची मागणी करण्यात आली होती. यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने काही महिन्यांपूर्वीच नवघर फाटा ते बोकडवीरा पोलीस चौकी असा चार ते साडेचार किलोमीटर लांबीचा मार्ग सिडकोच्या ताब्यात दिला आहे. त्याचे रुंदीकरण



करण्यात येणार आहे. मात्र बोकडवीरा पोलीस चौकी ते उरण शहरातील कोटनाकापर्यंतच्या एक ते दीड किलोमीटरच्या मार्गाचे काय होणार, या मार्गाचेही रुंदीकरण होणार का, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

## जितेंद्र आव्हाड म्हणाले, 'भाजपची जादू संपलेली आहे'

**ठाणे: गणेश बागडे**

आता शेवटचे अस्त्र तुमच्याकडे उरलंय, ते म्हणजे हिंदू विरूद्ध मुस्लीम. त्याचा वापर करा. पण, देश आता भुलणार नाही. तुमची जादू संपलेली आहे, असे विधान राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. वाढत्या महागाई पूर्ण देश त्रस्त असताना त्यावर उपाय शोधण्याऐवजी लोकांची दिशाभूल करण्यासाठी आता जर तुम्ही, या पातळीवर येत असाल की, लोक काय खातात, शाकाहार की मांसाहार? याचा अर्थ दहा वर्षांत तुम्ही काहीच करू शकला नाहीत. आता शेवटचे अस्त्र तुमच्याकडे उरलंय, ते म्हणजे हिंदू विरूद्ध मुस्लीम. त्याचा वापर करा. पण, देश आता भुलणार नाही. तुमची जादू संपलेली आहे, असे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

भारतातील सर्वच प्रश्न सुटले आहेत, अशा अविर्भावात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या प्रचार सभांमधून सांगत आहेत. इथे एकवेळच्या जेवणाची मारामारी आहे. बेरोजगारीमुळे युवक हैराण झाले आहेत. महागाईने उच्चांक गाठल्याने संसार मोडून पडलाय. चीनच्या अतिक्रमणामुळे ईशान्य भारताला असुरक्षित वाटत आहे. डॉलरच्या तुलनेत कधी नव्हे एवढा रूपया घसरला आहे. एकंदरीत भारताची अर्थव्यवस्था खड्ड्यात गेली आहे. हे सर्व यक्षप्रश्न समोर



असताना भारतात फक्त एकच प्रश्न उरला आहे तो म्हणजे, हिंदू विरूद्ध मुस्लीम पहिले म्हणे काय तर, काँग्रेसचा जाहीरनामा मुस्लीमधार्जिणा आहे. ज्या पाच गॅरेंटी काँग्रेसने दिल्या आहेत. त्या भारताच्या नागरिकांना दिल्या आहेत. पहिल्या वर्षी तीस लाख नोकऱ्यांचे वचन दिले आहे ते कोण्या एका समाजासाठी दिलेले नसून समस्त भारतीयांसाठी दिलेले आहे, असे आव्हाड यांनी म्हटले आहे. सर्वात कहर म्हणजे, काल नरेंद्र मोदी यांनी मांसाहार विरूद्ध शाकाहार या पातळीवर प्रचार आणून ठेवला. आम्ही आधीच सांगितले होते की, या देशाचे शाकाहारीकरण करणे हा त्यांचा एक छुपा अजेंडा आहे. आज त्यांनी तो उघड केला की 'मांसाहार करताना इतर लोकांच्या भावना दुखावल्या जातात हे इतर लोकांना समजत कसे नाही'.

आमच्या इथे तर बहुतेक देवदेवतांना मांसाहाराचा नैवेद्य दाखविला जातो, ही महाराष्ट्रातील पूर्वापार चालत आलेली प्रथा-परंपरा आहे. मग, तुळजाभवानी असो, यमाई असो, वणीची सप्तशृंगी असो, माहूरगडची रेणुकादेवी असो, मांढरदेवी अशी अनेक देवस्थाने आहेत. खंडोबा-भैरोबाला आपण नैवेद्य दाखवतो. त्यामुळे मराठी जनतेला हे काहीच नवीन नाही. गणेशोत्सवात गौरीला माश्यांचा नैवेद्य दाखवणे, ही कोळी समाजाची परंपरा आहे.

## वसई किल्ला परिसरात बिबट्याची दहशत कायम, संध्याकाळ नंतर रोरो सेवा बंद करण्याची सुचना

**वसई: दिगंबर जाधव**

वसाईच्या किल्ला परिसरातील बिबट्या मागील १५ दिवसांपासून मोकाट असल्याने या भागातील नागरिकांचे जीवन बिबट्याच्या दहशतीमुळे विस्कळीत झाले आहे. बिबटयाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी शनिवारी प्रांत अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत स्थानिकांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, बिबट्यामुळे संध्याकाळी ६ नंतर रोरो बोटीच्या सेवा बंद कराव्या अशी मागणी पुरातत्व खाते तसेच वनविभाहाने महाराष्ट्र सागरी मंडळाला केली आहे.

२९ मार्च रोजी वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यात बिबट्या आढळला होता. तेव्हापासून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



निर्माण झाले आहे. मात्र अद्याप बिबटा सापडलेला नाही. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी शनिवारी वसईच्या उपविभागीय कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत प्रांताधिकारी शेखर घाडगे, तहसीलदार डॉ. अविनाश कोष्टी, वनविभागाच्या मांडवी वनपरिक्षेत्र अधिकारी श्वेता आडे, पुरातत्व विभागाचे कैलास शिंदे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक रणजित आंधळे, रोरो सेवा कर्मचारी, कोळीयुवा शक्ती संघटनेचे पदाधिकारी तसेच किल्लाबंदर-पाचूबंदर येथील ग्रामस्थ उपस्थित होते. मात्र या बैठकीत बिबट्याला पकडण्यात येत असलेल्या अपयशामुळे नागरिक आक्रमक झाल्याचे चित्र दिसून आले.

किल्ल्यातील बिबट्यामुळे या भागातील जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. अशी परिस्थिती असतानाही वनविभागा कडून बिबट्याला पकडण्यासाठी हव्या त्या प्रमाणात प्रयत्न केले जात नसल्याचा आरोप कोळी युवा शक्ती संघटनेचे मिल्टन सौदीया यांनी केला आहे. तर बिबट्या बाबत अनेक संशय निर्माण होऊ लागले आहेत. हा बिबट्या पाळीव तर नाही ना? वन विभाग बिबट्याला शोधण्यासाठी खरंच पिंजरे व ट्रॅप कॅमेरे लावले आहेत का? बिबटयामुळे याभागातील नागरिकांची ये जा करण्याची वहिवाट कायमची बंद करण्याचा हा डाव तर नाही ना असे अनेक प्रश्न संजय कोळी यांनी या बैठकीत उपस्थित केले आहे. १६ दिवस उलटून झाले वन खाते बिबटयाला पकडू शकल नाही. यात वनखाते निष्फळ निष्क्रिय ठरलं आहे.

## आचारसंहितेच्या कचाट्यात शिष्यवृत्ती

**नवी मुंबई: धनश्री सट्टा**

लोकसभा निवडणुकीकरिता लागू झालेल्या आचारसंहितेमुळे नवी मुंबई हद्दीतील जवळपास ४० हजार विद्यार्थ्यांना मागील वर्षाची शिष्यवृत्ती आता थेट पावसाळ्यात मिळणार आहे. प्रशासकीय दिरंगाईचा फटका नवी मुंबईतील गरजू आणि शाळकरी विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. तसेच चालू २०२४-२५ वर्षातील शिष्यवृत्तीची प्रक्रिया लांबणीवर पडणार आहे. धिम्या गतीने पडताळणी आणि कागदपत्रांच्या अपूर्ततेमुळे विद्यार्थी आणि पालकवर्गाला शिष्यवृत्तीला मुकावे लागणार आहे.

नवी मुंबई महापालिकेतर्फे स्वःखर्चातून शहरातील विविध गरीब आणि गरजू घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती दिली जाते.




महापालिकेच्या हद्दीतील इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीच्या रकमेचा लाभ मिळतो. त्याकरिता महापालिकेतर्फे दरवर्षी सप्टेंबर अथवा ऑक्टोबर महिन्यांत शिष्यवृत्ती योजनेकरिता पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज आणि पुरावे मागवले जातात. मात्र, २०२३ या वर्षातील विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच ऑनलाईन अर्जाद्वारे शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला; परंतु हा निर्णय उशिराने झाल्यामुळे हे अर्ज ऑनलाईन पद्धतीने उशिरा उपलब्ध झाले. त्यामुळे अर्ज उशिरा आल्यामुळे अर्ज भरण्यासही पालक व विद्यार्थ्यांकडून उशीर झाला. उशिरा आलेल्या अर्जांची छानणी व पडताळणी करण्यात वेळ गेल्यामुळे गेल्यावर्षीच्या शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना यावर्षी देण्यात येणार होता.

# डाळींचे भाव पुन्हा गगनाला! तूरडाळ १५, तर मूगडाळ १० रुपयांनी महाग



■ मुंबई: नितीन देवळेकर

**गेल्या १५ दिवसांत तूरडाळ आणि मूगडाळ अनुक्रमे किमान १५ आणि दहा रुपयांनी महागली आहे. दरवाढीमुळे केंद्र सरकारने सर्व विक्रेते, गोदाम मालक, मिल मालकांना तूरडाळीचा साठा घोषित करण्याची सूचना केली. त्यामुळे विक्रेत्यांना लवकरच साठामर्यादा लागू होण्याची शक्यता असल्याचे अखिल भारतीय व्यापारी महासंघाचे म्हणणे आहे.**

तूरडाळीचे नवीन पीक नोव्हेंबरदरम्यान बाजारात येते. सर्वाधिक उत्पादन विदर्भातील अकोला, यवतमाळ आणि मराठवाडा क्षेत्रातील लातूरमध्ये घेतले जाते. यंदा देशभरात सरासरीपेक्षा सात टक्के अधिक पीक आले. मात्र, त्याचवेळी मागणी सातत्याने वाढत आहे. त्यामुळेच दरात वाढ सुरू झाली आहे.

मुंबईत मार्च महिन्यापर्यंत तूरडाळीचा घाऊक दर १२० ते १४० रुपये प्रतिकिलो होता. तो आता १४० ते १७० रुपये झाला आहे. यामुळे किरकोळ दर १४० रुपयांवरून १७० ते १९० रुपये प्रतिकिलोच्या घरात गेला आहे. तर घाऊक बाजारात ९० ते १०० रुपये असलेली मूगडाळ आता ११० ते १२० रुपये प्रतिकिलोवर गेली आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात मूगडाळीचा दर १४० रुपये प्रति किलोच्या घरात आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने साठा घोषित करण्याची सूचना केली आहे.

याबाबत अखिल भारतीय व्यापारी महासंघाचे (कॅट) महाराष्ट्र सचिव शंकर ठक्कर यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'ला सांगितले की, 'केंद्र सरकारकडून मिल मालक, गोदामे व घाऊक विक्रेत्यांना साठा घोषित करण्यास सांगितले जातेच. मात्र आता लहान व्यापारी, किरकोळ विक्रेते व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सुपर मार्केट साखळी दुकानदारांना १५ एप्रिलपर्यंत त्यांच्याकडील तूरडाळीचा साठा घोषित करण्यास सांगितले आहे. पुढील काळात साठामर्यादा आणण्याचे हे पहिले पाऊल आहे.' केंद्र सरकारने मागील वर्षीदेखील जून महिन्यात तूरडाळींच्या साठ्यावर मर्यादा घोषित केली होती. पुढे नवीन पीक बाजारात आल्यानंतर ही मर्यादा मागे घेण्यात आली होती.दरम्यान मुंबईत सध्या आवक आणि मागणी तंतोतंत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

'गेल्या महिन्यापर्यंत मुंबईत दररोज प्रत्येकी १५०० किलोचे १० ट्रक म्हणजेच १५ टन तूरडाळ येत होती. दरवाढ झाल्यापासून ही आवक ३ टनांवर आली. दररोजची मागणी ५ टनांच्या घरात आहे. मात्र, दर अधिक असल्याने किरकोळ व्यापारी कमी प्रमाणात खरेदी करीत आहेत. टप्प्याटप्प्याने खरेदी करण्याकडे किरकोळ विक्रेत्यांचा कल आहे.

# 'महानिर्मिती'कडे १६ दिवसांचाच कोळसासाठा, ७० ते ८० टक्केच औष्णिक वीजनिर्मिती

■ मुंबई: माधव अलवा

एप्रिल आणि मेसारख्या अधिक वीज मागणी असलेल्या काळात किमान २२ दिवसांसाठी २९.७० लाख टन कोळसासाठा औष्णिक वीज उत्पादन कंपन्यांनी ठेवणे केंद्रीय ऊर्जा आयोगाने अनिवार्य केले आहे. मात्र, त्या तुलनेत राज्य सरकारी महानिर्मिती या वीज उत्पादन कंपनीकडे सरासरीपेक्षा सहा दिवसांचा कोळसासाठा कमी आहे. मात्र, विजेच्या मागणीनुसार वीज उत्पादन करण्यासाठी पुरेसा कोळसा उपलब्ध असल्याचे कंपनीने म्हटले आहे. महानिर्मिती कंपनीची स्थापित वीजनिर्मिती क्षमता १३ हजार १५२ मेगावॉट आहे. त्यामध्ये कोळसाआधारित औष्णिक विजेचा वाटा ९५४० मेगावॉट आहे. कंपनीकडून सध्या दररोज सरासरी ६ हजार ते ८२०० मेगावॉट वीजनिर्मिती होत आहे. यासंबंधी कंपनीच्या



उच्चपदस्थ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महानिर्मितीकडील कोळसासाठा सध्या २१.२५ लाख टन आहे. सात औष्णिक वीज प्रकल्पांसाठी तो वापरात येत आहे. दररोज १.२० लाख ते १.३० लाख कोळसा केंद्र सरकारी कोल इंडियाअंतर्गत कंपन्यांकडून या सातही प्रकल्पांत येत आहे. त्या तुलनेत दररोजचा कोळसावापर १.१० ते १.२० लाख टन इतका आहे.'

केंद्रीय ऊर्जा आयोगाच्या किमान २९.७० लाख टन कोळशाच्या तुलनेत महानिर्मितीकडे २१.२५ लाख टनांचा कोळसा साठा आहे. हा कोळसा सातही प्रकल्पांत सरासरी १६ दिवसांपर्यंत वीजनिर्मिती करू शकेल, असा आहे. मात्र, ही स्थिती मागील वर्षीपेक्षा खूप चांगली असून, दररोज कोळशाची आवक होत असल्याने ही स्थिती चिंताजनक निश्चितच नाही.

# एसटीचे 'नाथजल' दिखाव्यापुरतेच! स्थानक, आगारांत स्थानिक बाटलीबंद पाण्याची विक्री

■ मुंबई: सचिन कदम

भारतीय रेल्वेच्या रेलनीरच्या धर्तीवर राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने नाथजल सुरू केले. नाथजलाने उन्हाळ्यात एसटी प्रवाशांची तहान भागत नसल्याचे राज्यात चित्र आहे. या बाटल्यांचा केवळ दिखावा करून स्थानिक बाटलीबंद पाण्याची मोठ्या प्रमाणात विक्री, महामंडळातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष, विक्रेत्यांना कमी दलाली, यांमुळे नाथजल प्रकल्पच बंद होण्याच्या मार्गावर आहे.

एसटी प्रवाशांना अर्धा आणि एक लिटर बाटलीबंद पाणी स्वस्त दरात मिळावे आणि महामंडळाला उत्पन्नाचा नवा स्रोत निर्माण व्हावा, यासाठी महामंडळाने नाथजल नावाने बाटलीबंद पाण्याची विक्री सुरू केली. यासाठी कंत्राटदार नेमून त्यावर नाथजलाचे ब्रँडिग करण्यात आले. एक लिटर नाथजल १५ रुपयांना विक्री केल्यास विक्रेत्यांना एक ते दोन रुपयांची दलाली मिळते आणि महामंडळाला प्रतिबाटलीमागे ८५ पैसे ते एक रुपया मिळतो. मात्र प्रत्यक्षात विक्रेते प्रवाशांना २० रुपयांना बाटलीबंद पाणी विकतात. मुंबईसारख्या शहरात नाथजलापेक्षा अन्य ब्रँडेड पाण्याची मागणी प्रवाशांकडून होत असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात स्थानिक बाटलीबंद पाण्यामागे तीन ते चार रुपये दलाली मिळते. त्यामुळे एसटी स्थानक-आगारांतील विक्रेत्यांकडून नाथजलाचा दर्शनी भागात




साठा केला जातो. विक्री मात्र स्थानिक बाटलीबंद पाण्याची होते. एसटी स्थानकात केवळ नाथजलाची विक्री करण्याचे लेखी आदेश आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही. नाथजलाशिवाय अन्य विक्री करणाऱ्यांवर कारवाईची तरतूद कागदावर आहे. मात्र किती विक्रेत्यांवर कारवाई केली, याची माहिती महामंडळाकडे उपलब्ध नाही. महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांना तहान भागवण्यासाठी स्थानिक बाटलीबंद पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. नाथजलाचा विस्तार वाढवण्यासह विक्रेत्यांना अधिक दलाली मिळावी यासाठी एसटी महामंडळाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक बोलावली होती. यात महामंडळाने स्वत:च नाथजलाचे उत्पादन करण्याबाबत पावले टाकावी अशा सूचना त्यांनी केल्या. यासाठी आवश्यक मदत राज्य सरकारकडून देण्याचे आश्वासनही महामंडळाला दिले. मात्र महामंडळ स्तरावरच नाथजलाच्या उत्पादनाबाबत कोणतीही हालचाल झाली नाही.

# रस्ते अपघातांचा धोका टळणार, मुंबईतील २० अपघातप्रवण क्षेत्रात उपाययोजना

■ मुंबई: विशाल कारंडे

मुंबईतील वाढती वाहनसंख्या आणि अपघात ही मुंबईकरांसाठी डोकेदुखी ठरली आहे. मुंबईतील असे २० धोकादायक अपघातप्रवण क्षेत्र (ब्लॅक स्पॉट) त्यासाठी कारणीभूत आहेत. तिथे अपघात होऊ नये, यासाठी मुंबई महापालिकेने 'ब्लूमबर्ग फिलॅन्थ्रॉपीज इनिशिएटिव्ह फॉर



ग्लोबल रोड सेफ्टी' आणि मुंबई वाहतूक पोलिसांच्या मदतीने उपाययोजनांसाठी आराखडा तयार केला आहे. २०पैकी तीन अपघातप्रवण क्षेत्रांचा आराखडा तयार झाला आहे. तीन ठिकाणी कामे करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून ना हरकत प्रमाणपत्रही मिळाले आहे. मुंबई महापालिका आणि मुंबई वाहतूक पोलिसांनी मुंबईतील सर्वाधिक अपघातप्रवण क्षेत्रांची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत एप्रिल २०२३ मध्ये बैठक पार पडली होती. बैठकीनंतर मुंबईतील काही अपघातप्रवण क्षेत्रांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती. मुंबईतील २० अपघातप्रवण क्षेत्रांजवळ अधिक अपघात होऊन पर्यायाने अधिक मृत्यू आणि जखमींची नोंद झाली आहे. त्यामुळे या सर्व ठिकाणी अपघातांची संख्या कमी व्हावी, या दृष्टिकोनातू सर्व क्षेत्रांच्या रचनेमध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. संबंधित अपघात क्षेत्र ठिकाणी आणि रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी नवीन आराखडे बनवण्याचा निर्णय पालिकेने घेतला. मुंबईतील २०पैकी तीन अपघातप्रवण क्षेत्रांचा आराखडा तयार झाल्यानंतर त्याला वाहतूक पोलिसांचीही मंजुरी मिळाली असून, काही किरकोळ कामांनाही सुरुवात केली आहे. तर १७ अपघातप्रवण क्षेत्रांचा आराखडा पालिकेने अंतिम केला असून, त्यापैकी सात क्षेत्रांवर काम सुरू करण्यासाठी मुंबई वाहतूक पोलिसांकडे आराखडे मंजुरीसाठी पाठवण्यात आल्याची माहिती मुंबई पालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. काही ठिकाणी मेट्रो रेल्वेची कामेही सुरू आहेत. त्यामुळे मेट्रो प्रशासनाशी बोलून अपघातप्रवण क्षेत्राच्या ठिकाणी आणखी काही उपाययोजना कराव्यात का, यासंदर्भात सूचना घेत असल्याचे सांगितले.

# मान्यतेनंतरही सीपीएस अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू करण्यास मुहूर्त सापडेना, ५०० जागांवरील प्रवेशासाठी विद्यार्थी प्रतीक्षेत

■ मुंबई: राकेश गायकवाड

पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविणाऱ्या कॉलेज ऑफ फिजिशियन अँड सर्जन (सीपीएस) या संस्थेच्या २६ अभ्यासक्रमांची मान्यता राज्य सरकारने गतवर्षी रद्द केली होती. सीपीएसने अभ्यासक्रम पुन्हा सुरू करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निर्धारित मानकांनुसार सीपीएसच्या १० अभ्यासक्रमांना मार्चमध्ये पुन्हा मान्यता दिली. मात्र मान्यतेनंतरही गतवर्षीच्या जागांसाठीची प्रवेश प्रक्रिया अद्याप वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून सुरू करण्यात आली नाही. त्यामुळे गतवर्षीच्या ५०० जागांसाठी निवड झालेले विद्यार्थी अद्यापही प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश न मिळणारे आणि आर्थिक क्षमता नसलेले अनेक विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी सीपीएसशी संलग्न वैद्यकीय महाविद्यालयांना प्राधान्य देतात. या संस्थेतील अभ्यासक्रमांचा दर्जा हा आयोगाने निर्धारित केलेल्या मानकांनुसारच असतो. त्यामुळे सध्याच्या घडीला देशातील सात राज्यांमधील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सीपीएसचे अभ्यासक्रम शिकविले जातात. यामध्ये प्रामुख्याने गुजरात, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, आसाम या राज्यांचा समावेश आहे. मात्र



१४ जुलै २०२३ रोजी महाराष्ट्र सरकारच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने सीपीएसशी संलग्न महाविद्यालयांमध्ये काही त्रुटी असल्याचे सांगत सीपीएसच्या २६ अभ्यासक्रमांची मान्यता रद्द केली. यामुळे राज्यामध्ये सीपीएस अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले होते. सीपीएसने हा निर्णय अन्यायकारक असल्याची भूमिका घेत महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे धाव घेतली. त्यानुसार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निर्धारित मानकांनुसार असलेल्या सीपीएसच्या १० अभ्यासक्रमांना १५ मार्च २०२४ रोजी मान्यता दिली. यामध्ये नेत्रविज्ञान, त्वचाविज्ञान, वैद्यकशास्त्र, रोगनिदानशास्त्र, शल्यचिकित्सा, स्त्रीरोग, पॅथॉलॉजी, बाल आरोग्य पदविका अभ्यासक्रम, स्त्रीरोग आणि प्रसूतीशास्त्र पदविका अभ्यासक्रम, डिपन्यूज पॅनब्रोन्कोलायटिस यांचा समावेश आहे. सीपीएसद्वारे दोन वर्षांचा पदविका आणि तीन वर्षांचा फेलोशिप अभ्यासक्रमांचा कार्यकाळ रितसर पूर्ण केल्यानंतर डॉक्टरने एक्झिट परीक्षा उत्तीर्ण झाल्यावरच्या त्यांना विशेषज्ञ म्हणून नोंदणी करण्यास मान्यता देण्यात येते. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने सीपीएसच्या १० अभ्यासक्रमांना मान्यता दिल्यामुळे गतवर्षी या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. मात्र मान्यतेनंतरही या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया वैद्यकीय शिक्षण व सशोधन संचालनालयाकडू राबविण्यात आलेली नाही.

# कार्गोच्या नव्या तळाद्वारे १६४ कोटींचा महसूल, जेएनपीएला गुंतवणुकीचा होणार फायदा

■ मुंबई: रघुवीर जाधव

देशातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाला (जेएनपीए) कार्गो हाताळणीच्या नव्या सुविधेद्वारे वार्षिक १६४ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होणार आहे. या सुविधेसाठी प्राधिकरणाने २२५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. जेएनपीएमध्ये एकूण पाच बंदरांचा समावेश आहे. तर सुरक्षेच्यादृष्टीने द्रवरूप पदार्थांच्या हाताळणीसाठी स्वतंत्र तळ आहे. त्यामध्ये



प्रामुख्याने द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी), द्रवरूप पेट्रोलियम वायू (एलपीजी) यांचा समावेश होतो. बंदरावर २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६.४३ दशलक्ष (२० फूट उंचीचे) कंटेनरद्वारे एकूण ८५.८२ दशलक्ष टन कार्गोची हाताळणी झाली. त्यापैकी ६.५० दशलक्ष टन हाताळणी ही द्रवरूप पदार्थांची होती. जहाजे किंवा टँकर उभ्या करण्याच्या दोन जेट्टींद्वारे ही हाताळणी करण्यात आली. त्यानंतर आता प्राधिकरणाने अलीकडेच द्रवरूप पदार्थांच्या हाताळणीसाठी दोन अतिरिक्त जेट्टी उभ्या केल्या आहेत.

जेएनपीएने दिलेल्या माहितीनुसार, भविष्यातील गरज ओळखून व द्रवरूप सामानाची आयात वाढती असल्याने प्राधिकरणाने आणखी दोन जेट्ट्या अलीकडेच २२५ कोटी रुपये खर्चून उभ्या केल्या. या जेट्टी हाताळण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. त्यानुसार मेसर्स जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने अव्वल बोलीदार या नात्याने निविदा जिंकली. कंपनी यासाठी २५२ रुपये प्रतिटन मालकी हक्क शुल्क (रॉयल्टी) प्राधिकरणाला देणार आहे. त्या माध्यमातून वार्षिक ६५ लाख टनाद्वारे प्राधिकरण वर्षाला १६३.८० कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे.

# हत्या झालेल्या श्वानाला न्याय मिळवून देण्यासाठी अभिनेत्री आयेशा जुल्का उच्च न्यायालयात

■ मुंबई: नितीन देवळेकर

आपल्याला पाळीव श्वानाची हत्या करणाऱ्या काळजीवाहकाविरोधातील खटला गेली चार वर्षे प्रलंबित आहे. त्यामुळे, तो लवकरात लवकर निकाली काढून आपल्या श्वानाला न्याय मिळवून द्यावा, या मागणीसाठी बॉलिवूड अभिनेत्री आयेशा जुल्का यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. चार वर्षांपासून खटला प्रलंबित असून त्याच्या सुनावणीला सुरूवातही झालेली नाही, असा दावाही आयेशा हिने केला आहे. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर आयेशा यांच्या याचिकेवर प्राथमिक सुनावणी झाली. त्यावेळी, याचिकेवर लवकरात लवकर सुनावणी घेण्याची मागणी तिच्यातर्फे करण्यात आली.



मात्र, या मागणीमुळेच या प्रकरणी संबंधित एकलपीठाकडे दाद मागण्याची सूचना खंडपीठाने आयेशा यांना केली. आयेशा यांच्या लोणावळा येथील बंगल्यात काम करणाऱ्या काळजीवाहकाने (केअरटेकर) १३ सप्टेंबर २०२० रोजी पाळीव श्वान रॉकीचा पाण्याच्या टाकीत बुडून मृत्यू झाल्याची माहिती दिली. मात्र, आयेशा यांच्या मनात संशय निर्माण झाल्याने त्यांनी रॉकीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला. पशुवैद्यकीय तज्ज्ञांनी रॉकीचा मृत्यू बुडून नाहीतर गळा दाबल्याने झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद केले. या अहवालाच्या आधारावर आयेशा यांनी १७ सप्टेंबर २०२० रोजी काळजीवाहकाविरोधात श्वानाची हत्या केल्याची तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेऊन न्यायालयाने राम नाथू आंद्रे याच्यावर मद्यधुंद अवस्थेत श्वानाचा गळा दाबल्याचा गुन्हा दाखल केला व २५ सप्टेंबर रोजी त्याला अटक केली. आरोपीने चौकशीत गुन्हा कबूल केल्याचा दावा पोलिसांनी केला. मात्र, दोन दिवसांनी आंद्रेला जामीन मंजूर करण्यात आला. पुढे, या प्रकरणी मावळ पोलिसांनी ७ जानेवारी २०२१ रोजी आरोपपत्र दाखल केले. झुल्का यांनी फेब्रुवारी २०२१ मध्ये दंडाधिकारी न्यायालयात धाव घेऊन हस्तक्षेप अर्ज दाखल केला व प्रकरणाची सुनावणी अद्याप प्रलंबित असल्याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले.

# पुण्यातील ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रांची उभारणी, मतदानाचा टक्का वाढविण्याचे आव्हान

■ पुणे: अकिल शेख

लोकसभा निवडणुकीतील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी कमी मतदान असलेल्या शहरी भागांमधील सहकारी गृहनिर्माण संस्था अर्थात सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. देशात प्रथमच पुण्यातील सुमारे ३५ सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. येत्या १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी या ठिकाणी मतदान करता येणार आहे.जिल्ह्यात ८२ लाख ९२ हजार ९५१ मतदारांची नोंद झाली आहे. पैकी ४३ लाख २८ हजार ९५४ पुरुष मतदार असून, ३९ लाख ६३ हजार २६९ महिला आणि उर्वरित ७२८ तृतीयपंथीय मतदार आहेत.



'खडकवासला परिसरात सर्वाधिक १५ आणि भोर तालुक्यातील पाच सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. याशिवाय वडगाव शेरीतील सात, कोथरूडमधील आठ सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रे असतील,' अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली. पाच किंवा त्यापेक्षा जास्त मतदान केंद्रे असलेल्या इमारतीमध्ये विविध सोयीसुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये वाहनतळ, वैद्यकीय सुविधा, पाळणाघर, स्त्रियांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह आदींचा समावेश आहे. मतदारांना मतदान केंद्रांची माहिती देण्यासाठी शहरी भागात प्रत्येक वॉर्ड कार्यालयात मदत केंद्र स्थापन करण्यात येणार आहे, असेही डॉ. दिवसे यांनी नमूद केले.

# मुंबईकरांनो मुलांना सांभाळा! वर्षाला किमान चार हजार मुलांना होतोय TB, कशी घ्याल काळजी?

■ मुंबई: माधव अलवा

**क्षयरोगाचा संसर्ग मुलांमध्ये होण्याचे प्रमाण मागील काही वर्षांमध्ये कमी झाले आहे. मात्र ते नगण्य झालेले नाही. प्रौढांकडून मुलांना होणारा संसर्ग, हे यामागील प्रमुख कारण आहे. महापालिकेच्या क्षयरोग नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार, २०२३मध्ये मुंबईमध्ये ४,०६६ मुलांना क्षयरोगाची लागण झाली आहे.**

दर वर्षागणिक ही संख्या वाढतच आहे. उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषण केले असता दिवसाला अकरा मुलांना क्षयरोगाची लागण झाल्याचे दिसून येते. कुपोषण आणि अन्य आजारग्रस्त मुलांनाही क्षयरोगाची लागण होण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक कुटुंबांमध्ये क्षयरोग झाल्याचे लपवून ठेवले जाते. आजाराचे निदान योग्यवेळी झाले तर त्यासाठी प्रतिबंधात्मक उपचार वेळेवर सुरू करता येतात. मुंबईच्या काही प्रभागांमध्ये क्षयरोगाच्या आजाराचे आव्हान अधिक गंभीर आहे. लहान घरे, दाट लोकसंख्या, झोपडपट्टीमध्ये दाटीवाटीने राहणाऱ्या लोकसंख्येमुळे क्षयरोगाच्या आजाराचा प्रादुर्भाव वाढतो. एका कुटुंबामध्ये पाच ते सात सदस्य राहत असल्यास कुटुंबामध्ये अन्य सदस्यालाही क्षयरोगाची लागण होते. कुटुंबामध्ये कोणत्याही



व्यक्तीला क्षयरोगाचा संसर्ग झाला असेल तर मास्क लावायला हवा. तसेच स्वच्छता राखायला हवी. अनेकदा शिंकणे, खोकणे तसेच कुठेही थुंकल्यामुळे कुटुंबातील एका सदस्याकडून दुसऱ्या व्यक्तीला संसर्गाची लागण होते. विशेषत: मुलांना क्षयरोगाचा प्रादुर्भाव होतो. मुलांची रोगप्रतिकारशक्ती कमी असल्यास संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो. त्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, याकडे संसर्गजन्य आजाराचे तज्ज्ञ डॉ. व्ही. आर. पाटील यांनी लक्ष वेधले. २०२१मध्ये ४,५६९ मुलांना क्षयरोग झाल्याचे निदान झाले होते. २०२२मध्ये त्यात घट होऊन ही संख्या ४,२८५ झाली. २०२३मध्ये मुंबईमध्ये ४०६६ मुलांना क्षयरोगाची लागण झाल्याचे दिसून आले आहे.

# रेल्वे रुळांवर पाणी साचू नये म्हणून खबरदारी, पश्चिम, मध्य रेल्वे स्थानकांवर महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासनाची संयुक्त पाहणी



■ **मुंबई: सचिन कदम**

पावसाळ्यात रेल्वे रुळावर पाणी साचून रेल्वे सेवा ठप्प होऊ नये म्हणून हाती घेतलेल्या पावसाळापूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी संयुक्त पाहणी केली. शहर भागातील परिमंडळ १ अंतर्गत येणाऱ्या मध्य आणि पश्चिम रेल्वेची स्थानके, तसेच परिसर आणि विभाग कार्यालयातील तयारीची अधिकाऱ्यांनी पाहणी केली. पावसाळ्यात अतिवृष्टी झाली की रेल्वे रुळांवर पाणी साचून लोकल सेवा ठप्प होते. अशी वेळ पावसाळ्यात येऊ नये म्हणून पालिका प्रशासनाने यंदा विशेष काळजी घेतली आहे. शहर भागातील मध्य रेल्वे मार्गावरील स्थानके सखलभागात असल्यामुळे या ठिकाणी पाणी साचते. त्यामुळे या भागात विशेष काळजी घ्यावी लागते. या दृष्टीने महानगरपालिकेच्या परिमंडळ १ च्या उपआयुक्त डॉ. संगीता हसनाळे आणि रेल्वे अधिकाऱ्यांनी शनिवारी पश्चिम आणि मध्य रेल्वे स्थानकांची पाहणी केली. पावसाळा सुरू होण्यापूर्वी नाल्यातून काढलेला गाळ, तसेच राडारोडा उचलणे, यासह आपत्कालीन नियंत्रण कक्ष सज्ज ठेवण्याच्या सूचना उपायुक्तांनी यावेळी यंत्रणांना दिल्या. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी नुकतीच पावसाळा पूर्वतयारीच्या कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत रेल्वे प्रशासनातर्फे पश्चिम रेल्वे मार्गावरील मुंबई सेंट्रल, चर्नी रोड व ग्रँट रोड तसेच मध्य रेल्वे मार्गावरील सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकांबाबत काही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. या मुद्द्यांचा निपटारा करण्याच्या अनुषंगाने डॉ. संगीता हसनाळे यांनी रेल्वे स्थानकांची पाहणी केली. दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचत असलेल्या सँडहर्स्ट रोड स्थानकाची पाहणी करण्यात आली. यावेळी बी विभागाचे सहायक आयुक्त उद्धव चंदनशिवे, सँडहर्स्ट रेल्वे स्थानकाचे व्यवस्थापक विनायक शेवाळे, तसेच बी विभागातील विविध खात्यांचे प्रमुख उपस्थित होते. सँडहर्स्ट रोड रेल्वे रुळालगत असलेल्या इमारतीची पाहणी करून पावसाळ्याच्या दृष्टीने योग्य उपाययोजना कराव्यात; तसेच रेल्वेअंतर्गत असलेल्या ठिकाणी गाळ, कचरा, राडारोडा उचलण्यात यावा; नियमितपणे नाले स्वच्छता करावी, असे निर्देश उपायुक्त डॉ. हसनाळे यांनी दिले.

## पुनर्मूल्यांकन अर्जांचा गोंधळ: मुंबई विद्यापीठाच्या विधि शाखेच्या नवव्या सत्राचे विद्यार्थी संभ्रमात

■ **मुंबई: यश सावंत**

वैयक्तिक माहिती भरल्यानंतर अर्ज अवैध दाखविणे, लिंक व्यवस्थित सुरू न राहणे आणि अभ्यासक्रमाचे नावच न दाखविणे अशा अडचणींना विधि शाखेच्या नवव्या सत्र परीक्षेच्या विद्यार्थ्यांना पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज भरताना सामोरे जावे लागत आहे. आधी अर्ज अवैध दिसत होता, आता लिंकच दिसत नाही. ही लिंक कधी सुरू होणार, करण्यात आला. त्यानंतर संकेतस्थळावर विधि शाखेसाठी पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज भरण्याची मुदत १४ एप्रिलपर्यंत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतु त्यानंतर विद्यार्थ्यांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला. परंतु विधि शाखेच्या नवव्या सत्र परीक्षेच्या पुनर्मूल्यांकनासाठीची लिंक कधी सुरू होणार, याबाबत कोणतीही स्पष्टता विद्यापीठ प्रशासनाकडून दिली गेली




याबाबत कोणतीही स्पष्टता मुंबई विद्यापीठ प्रशासनाकडून दिली गेली नसल्याने विद्यार्थी संभ्रमात आहेत. मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ अंतर्गत पाचवे वर्ष विधि शाखा (पाच वर्षीय अभ्यासक्रम) नवव्या सत्राची परीक्षा ५ ते १४ डिसेंबर २०२३ या कालावधीत घेतली होती. कोणत्याही परीक्षेचा निकाल ४५ दिवसांत जाहीर होणे अपेक्षित आहे. असे असताना या परीक्षेचा निकाल तब्बल १११ दिवसांनी ३ एप्रिल २०२४ रोजी जाहीर नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. दरम्यान, 'प्रत्येक अभ्यासक्रमासाठीचा प्रोग्रॅम कोड हा वेगळा असतो. सध्या सुरू असलेली लिंक ही विधि शाखेच्या दुसऱ्या परीक्षेची आहे. विधि शाखेच्या नवव्या सत्र परीक्षेच्या पुनर्मूल्यांकनाची लिंक अद्याप सुरू झालेली नाही. ती लवकरच सुरू करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी गोंधळून जाण्याचे कारण नाही', असे मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्पष्ट केले.

## नवी मुंबईत फ्लेमिंगो अधिवासाचा गळा घोटला जातोय का? सरकारी यंत्रणाच ऱ्हासास कारणीभूत?

■ **मुंबई: सचिन कदम**

देशातील सुनियोजित शहर अशी ओळख मिरविणारे नवी मुंबई गेल्या काही वर्षात फ्लेमिंगो पक्ष्यांच्या अधिवासाचे शहर म्हणूनही नावारूपास आले आहे. असे असले तरी गेल्या वर्षभरात या दुर्मीळ आणि सुंदर पक्ष्याच्या अधिवासावर पद्धतशीरपणे अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशातील मोठ्या उद्योगपतींसाठी या जागा खुल्या करण्याचे सरकारी प्रयत्न वादात सापडले असताना पक्ष्यांचा अधिवास असलेल्या पाणथळींच्या जागा कोरड्या करणे, संवेदनशील क्षेत्रात रस्त्याचे बांधकाम तसेच सौरदिव्यांची उभारणी करणे यासारखे वादग्रस्त उद्योग महापालिकेनेच सुरू केले आहेत. मध्यंतरी बेलापूर भागात एका दिशादर्शक फलकाला आपटून चार फ्लेमिंगो पक्ष्यांना जीव गमवावा लागला होता. नवी मुंबईचे ब्रँडिंग एकीकडे 'फ्लेमिंगो सिटी' असे करायचे आणि दुसरीकडे या पक्ष्यांच्या अधिवासाचे मार्ग बंद करायचे असे संतापजनक प्रकार या



शहरात सरकारी यंत्रणांच्या आशिर्वादानेच सुरू आहेत.

नवी मुंबईत असलेल्या पाणथळ जागांवर अनेक वर्षापासून परदेशी पक्षी येण्याचे प्रमाण मोठे आहे. या शहरातील उरण तालुका हा नैसर्गिक संपत्तीने युक्त आहे. या निसर्गात येथील वन्यजीव अधिकच भर टाकत असतात. उरण तालुक्यातील खाडी क्षेत्रातील पाणवठ्यांवर सुरुवातीला हजारो फ्लेमिंगोसह विविध पक्ष्यांच्या शेकडो प्रजाती पहायला मिळत. आहारस्त्रोत आणि पोषक वातावरण येथे असल्याने दुर्मीळ पक्ष्यांसाठी हा तालुका आवडीचे ठिकाण ठरत असे. मात्र याच भागात सुरू असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बांधकाम तसेच इतर विकास प्रकल्पांमुळे शेकडो एकरावरील पाणथळीचे क्षेत्र यापूर्वीच नष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे एके काळी फ्लेमिंगोंनी बहरलेला हा परिसर आता उजाड होतो की काय असे चित्र आहे. उरण तालुक्यातील हे पक्षी आता नवी मुंबई महापालिका हद्दीत असलेल्या नेरुळ, सीवूड, बेलापूर भागातील पाणथळींवर निवाऱ्यासाठी येऊ लागले आहेत. गेल्या काही वर्षात हे प्रमाण इतके वाढले आहे की ही या शहराची ओळखच या पक्ष्यांच्या नावाने होऊ लागली आहे. गेल्या चार ते पाच वर्षांपासून या शहरात फ्लेमिंगो पक्षी येण्याचे प्रमाण वाढले आहे. ठाणे खाडी परिसरात यापूर्वी गरुडांसह इतर पक्षी तसेच कीटकांच्या विविध २०० प्रजातींची नोंद झाली आहे. फ्लेमिंगो पक्ष्याप्रमाणे बरेच वेगवेगळे पक्षी या भागात येत असतात.

## ठाणे लोकसभा जागेची मागणी करणे कार्यकर्त्यांचा अधिकार, भाजप नेते प्रविण दरेकर यांचे सूचक वक्तव्य

■ **ठाणे: तृप्ती गोरे**

ठाणे लोकसभा भाजपसाठी वेगळे ठिकाण आहे. त्यामुळे ठाणे लोकसभेसाठी भाजपचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा टोकाचा आग्रह करत आहेत. ठाण्यात कधीकाळी भाजपचे रामभाऊ म्हाळगी, रामभाऊ कापसे हे खासदार होते. सध्या ठाण्यात आमचे आमदार, नगरसेवक, कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली आहे. त्यामुळे ठाणे लोकसभेच्या उमेदवारीसाठी आमची मागणी आहे, तो कार्यकर्त्यांचा अधिकार आहे असे सूचक वक्तव्य भाजपचे विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी केले. गेल्याकाही दिवसांपासून ठाणे लोकसभेच्या उमेदवारीवरून भाजप आणि शिवसेनेमध्ये रस्सीखेच सुरू आहे. दरेकर यांच्या या विधानाने ठाणे लोकसभेसाठी भाजपकडून जोरदार प्रयत्न सुरू असल्याची चर्चा सुरू झाली आहे. मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे यांच्यासाठी ठाणे लोकसभा अतिशय महत्त्वाची मानली जाते. गेल्याकाही वर्षांपासून ठाणे जिल्ह्यात भाजपचे बळ वाढत असल्याने आता ठाणे लोकसभेच्या उमेदवारीवर भाजपने दावा करण्यास सुरूवात केली आहे. महायुतीच्या माध्यमातून शहरात शिंदे याची शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून (अजित पवार गट) बैठका घेतल्या जात आहे. परंतु उमेदवार निश्चित होत नसल्याने शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. शिंदे गटाकडून आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रविंद्र फाटक आणि माजी महापौर नरेश म्हस्के यांची नावे चर्चेत आहेत.

## डोंबिवलीतील शिक्षण संस्था चालकाची मंत्रालयातील शिक्षण विभागातील मध्यस्थाकडून फसवणूक

■ **डोंबिवली: सतिश सोनावणे**

डोंबिवलीतील सागाव आणि दिवा येथील शाळांचा विश्वस्त असलेल्या एका शाळा चालकाची मुंबईत मंत्रालयात शिक्षण विभागात मध्यस्थ म्हणून काम करणाऱ्या एका इसमाने १० लाख ६२ हजार ३२ रूपयांची फसवणूक केली आहे. मागील तीन वर्षांच्या काळात हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. या शाळांच्या विश्वस्ताने या फसवणूक प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात शुक्रवारी तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. ॲड. शिवा कृष्णमूर्ती अय्यर (६०) असे तक्रारदार आणि शाळा विश्वस्ताचे नाव आहे. ते डोंबिवली पूर्वेतील सागाव येथील चेरानगर, रविकिरण सोसायटी भागात राहतात. ॲड. अय्यर आणि त्यांचे सहकारी सागाव येथे जयभारत इंग्लिश हायस्कूल, दिवा येथे साऊथ इंडियन इंग्लिश स्कूल या दोन शिक्षण संस्था २० वर्षापासून चालवितात, असे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी सांगितले, सागाव येथील जय भारत शाळेत अकरावी, बारावीच्या तुकड्या शाळा चालकांना सुरू करायच्या होत्या. यासाठी शासनाच्या शिक्षण विभागाची परवानगी गरजेची होती. दिवा येथील साऊथ



इंडियन शाळेला शासनाकडून दहावीचा इंडेक्स क्रमांक आवश्यक होता. या दोन्ही परवानग्यांसाठी शाळा चालकांनी शासनाच्या शिक्षण विभागाकडे मंत्रालयात अर्ज दाखल केले होते. या दोन्ही विषयांचा पाठपुरावा आणि हे काम लवकर होण्यासाठी शाळा चालक शिक्षण विभागाशी संबंधित मध्यस्थाच्या प्रयत्नात होते. ॲड. अय्यर यांना ठाणे येथील शाळेतील एक विश्वस्त गीता सक्सेन यांनी धनाजी जानराव पाटील (रा. अनमोल नयनतारा गोल्ड सोसायटी, टोपाझ, नाशिक) यांचा संदर्भ दिला. पाटील यांना शिक्षण विभागाची खूप माहिती असून ते आपले काम करून देतील असे सांगितले. शाळेच्या एक विश्वस्त ज्योत्सना अय्यर यांनी धनाजी पाटील यांच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला. पाटील यांनी ज्योत्सना यांना शाळेच्या कामाविषयी बोलण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील एका हॉटेलमध्ये बोलविले. ज्योत्सना आणि शेट्टीयार वासवन हे पाटील यांना भेटण्यासाठी संबंधित हॉटेलमध्ये गेले.

# व्यापक जबाबदारीचे सर्वोच्च न्यायालय

भारताच्या घटना समितीचे सदस्य अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांच्या मते 'भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला जगातील कोणत्याही सर्वोच्च न्यायालयाच्या तुलनेत सर्वाधिक अधिकार आहेत.' आपला देश संसद, कार्यपालिका आणि न्याययंत्रणा या तीन स्तंभांच्या आधारावर आहे. या तीनपैकी कोणताही एक स्तंभ निखळला अथवा घटनाविरोधी वर्तन करू लागला तर आपल्या देशाचा पूर्ण डोलारा कोसळेल. या तिन्ही स्तंभांना आपापले स्वतंत्र अधिकार दिलेले असून, या तिन्ही स्तंभांनी एकमेकांच्या कार्यक्षेत हस्तक्षेप न करता एकमेकांवर अंकुश ठेवण्याचे काम करणे अपेक्षित असते.

संसदेचे काम कायदा करणे असून, कार्यपालिकेचे काम त्या कायद्याची अंमलबजावणी करणे हे आहे. मात्र त्या कायद्याचा अर्थ लावणे आणि तो कायदा राज्यघटनेच्या चौकटीत बसतो आहे किंवा नाही, हे तपासण्याचे अधिकार संपूर्णपणे न्याय यंत्रणेला आहेत. भारतातमध्ये या न्यायव्यवस्थेच्या केंद्रस्थानी देशाचे सर्वोच्च न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाचे उद्घाटन २८ जानेवारी १९५० रोजी झाले. पूर्वी भारत सरकार कायदा-१९३५ नुसार देशात 'फेडरल कोर्ट' कार्यरत होते आणि त्या न्यायालयातील अपील ब्रिटिश प्रिव्ही कौन्सिल येथे होत असे. घटनेच्या सुरुवातीच्या तरतुदींनुसार सर्वोच्च न्यायालयासाठी एकूण आठ न्यायाधीशांची तरतूद करण्यात आली होती. मात्र ती संख्या वाढत जाऊन आज ३४ इतकी झालेली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदासाठी संबंधित व्यक्ती भारताची नागरिक असणे आणि देशातील कोणत्याही उच्च न्यायालयात किमान पाच वर्षे न्यायाधीश म्हणून काम केलेले असणे अथवा देशाच्या कोणत्याही उच्च न्यायालयात किमान दहा वर्षे वकील म्हणून कार्यरत असणे अथवा




राष्ट्रपतींच्या मते संबंधित व्यक्ती प्रख्यात विधिज्ञ असणे, या पूर्वअटी आहेत. न्यायाधीशांच्या नियुक्तीबद्दलचा कायदा गेल्या ७० वर्षात मोठ्या प्रमाणावर बदलला गेला आहे. सुरुवातीला न्यायाधीशांच्या नियुक्त्या या कार्यपालिकेकडूनच होत असत आणि या नियुक्त्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे केवळ औपचारिक मत घेतले जाई. त्यानंतरच्या काळात 'सेकंड जजेस केस'नुसार सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांचे मत राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे, अशा प्रकारचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. नंतरच्या काळात संसदेने कायद्याद्वारे तयार केलेला राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगदेखील सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवला आहे. देशाच्या सरन्यायाधीशांची नियुक्ती गेल्या ७५ वर्षांत दोनदा वादग्रस्त ठरली असून, इंदिरा गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात दोनदा सर्वात ज्येष्ठ न्यायाधीशांना डावलून कनिष्ठ न्यायाधीशांची सरन्यायाधीशपदावर नियुक्ती करण्यात आली होती.

अर्थात, डावलल्या गेलेल्या न्यायाधीशांनी त्वरित राजीनामे दिले. मात्र १९७७ मध्ये हा प्रसंग घडल्यानंतर पुन्हा असा प्रकार आजपर्यंत घडलेला नाही. न्यायाधीशांना पदावरून दूर करण्याची घटनात्मक प्रक्रिया अत्यंत कठीण असून, संसदेने संपूर्ण बहुमताने आणि उपस्थित सदस्यांपैकी दोन तृतीयांशपेक्षा कमी नाही इतक्या सदस्यांनी ठराव संमत केल्यानंतर तो ठराव राष्ट्रपतींना सादर करावा लागतो. त्यानंतर राष्ट्रपती अशा न्यायाधीशांना पदावरून दूर करण्याचा आदेश देतात. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र बरेच मोठे असून, मूळ अधिकारक्षेत्रात केंद्र व राज्य यांच्यातील वाद, राज्य व इतर राज्यांतील वाद, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकांच्या संदर्भातील वाद, लोकसेवा आयोगाच्या सदस्यांचे आणि सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या सदस्यांचे गैरवर्तन (संसदेने शिफारस केल्यास) व त्याची चौकशी, केंद्र व राज्य सरकारांनी केलेल्या कायद्यांची घटनात्मक वैधता तपासणे अशा प्रकारचे मूळ अधिकारक्षेत्र सर्वोच्च न्यायालयाचे आहे.

त्यासोबतच राष्ट्रपतींनी सल्ला मागितल्यास तो सल्ला देणे, मूलभूत अधिकारांच्या उल्लंघनाच्या संदर्भात रिट याचिका दाखल झाल्यास त्यावर निर्णय देणे; तसेच उच्च न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांवर अपिलीय न्यायालय म्हणून निर्णय देणे आणि देशातील कोणतेही न्यायालय अथवा प्राधिकरण यांनी दिलेल्या निर्णयांवर विशेष अनुमती याचिका ऐकणे, असे अत्यंत मोठे अधिकारक्षेत्र सर्वोच्च न्यायालयास आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४१ नुसार सर्वोच्च न्यायालयाने घोषित केलेला कायदा हा सर्व न्यायालयांवर बंधनकारक असतो. हे सर्वोच्च न्यायालयाचे सर्वात मोठे शक्तिस्थान आहे. गेल्या ७५ वर्षांतील सर्वोच्च न्यायालयाची कामगिरी पाहिल्यास भारतासारख्या खंडप्राय देशातील शेकडो कोटी लोकांना न्याय देण्याचे कार्य शक्य तितक्या उत्तम पद्धतीने सर्वोच्च न्यायालयाने पार पाडले आहे. अर्थात, सुधारणांना अजूनही बराच वाव आहे.

## दुष्टचक्राचे प्रवर्तक

जगाचे पुढारपण आपल्याकडे आहे, या धारणेने वावरणाऱ्या आर्थिक-लष्करी शक्ती आंतरराष्ट्रीय पातळीवर जेव्हा कमालीच्या संकुचित हितसंबंधांचे राजकारण रेटू पाहतात तेव्हा शांतता, स्थैर्य कसे झाकोळून जाते, याचे प्रत्यंतर सध्या जगाला येत आहे.

अशा राजकारणातून होणारी हानी तेवढ्यापुरती राहात नाही, तिचे परिणाम दूरगामी होतात आणि त्याच्या झळा सगळ्यांना सोसाव्या लागतात. थोडक्यात एका संघर्षातून दुसरा, त्यातून तिसरा... अशा प्रकारचे दुष्टचक्र सुरू होते. रशियाचे युक्रेनविरुद्ध सुरू असलेले युद्ध आणि सहा महिन्यांपूर्वी 'हमास'ने इस्राईलवर चढविलेल्या हल्ल्यानंतर सुरू झालेले युद्ध थांबण्याची चिन्हे तर नाहीतच; पण त्या संघर्षाची व्याप्ती वाढत चालली आहे. हे सगळे हाताबाहेर जाऊ नये, यासाठी सर्वांत जास्त परिणामकारक प्रयत्न करण्याची ताकद कोणाकडे असेल तर ती अमेरिकेकडे आहे. पण ती त्या दिशेने वापरली का जात नाही, हा मोठाच प्रश्न आहे. युक्रेनला सुरू असलेल्या अखंड शस्त्रपुरवठ्यामागे अमेरिकेतील शस्त्रास्त्रउत्पादकांची प्रबळ लॉबी आहे, हे लपून राहिलेले नाही. पश्चिम आशियातही इस्राईलला आवर कसा घालायचा याबाबत बायडेन यांच्याकडे काही स्पष्ट धोरण असल्याचे दिसत नाही.

अध्यक्ष बायडेन यांनी एकीकडे इस्राईलच्या पाठीशी आहोत, असे सांगतानाच तेथील बेंजामिन नेतान्याहू सरकारला सबुरीचे आवाहनही केले. पण युद्धज्वर सौम्य होण्याची चिन्हे दिसत नाहीत. उलट अमेरिकेने काठावर राहू नये, 'हमास' आणि पश्चिम आशियातील इतर शत्रूंच्या विरोधात अधिक सक्रियतेने



उतरावे, अशीच इस्राईलची इच्छा आहे.

दमास्कसमधील इराणच्या दूतावासावर हल्ला चढवून 'इराणी रिव्होल्युशनरी गार्ड'च्या दोन जनरलसह सात अधिकाऱ्यांना इस्राईलने ठार मारले. हे कमांडर पॅलेस्टिनी जिहादींना भेटण्यासाठी तेथे गेल्याची माहिती इस्राईली गुप्तचरांना मिळाल्यानंतर हा हल्ला चढविण्यात आल्याचे सांगण्यात येते. हे करण्यामागे अमेरिकेला या संघर्षात जास्तीत जास्त गुंतवण्याची इस्राईलची इच्छा हे कारण असू शकते. या कृतीनंतर इराणची प्रतिक्रिया येणार हे उघडच होते. काही ड्रोन हल्ले आणि होर्मूझ सामुद्रधुनीजवळ इस्राईलशी संबंधित मालवाहू जहाजाचे इराणच्या 'रिव्होल्युशनरी गार्ड'ने केलेले अपहरण यातून इराणचे इरादे स्पष्ट झाले आहेत. जहाजावर १७ भारतीय नागरिक आहेत. आता त्यांना सोडविण्यासाठी भारत सरकारला राजनैतिक पातळीवर प्रयत्न करावे लागत आहेत. या संघर्षाची व्याप्ती आणखी वाढली तर भारतासह अनेक देशांवर त्याचे विपरीत परिणाम होण्याची भीती आहे. पहिला फटका तेलपुरवठ्याला बसू शकतो. खनिज तेलाचे दर वाढले तर आयातीवर प्रामुख्याने अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांना झळ बसू शकते. तिकडे रशिया-युक्रेन युद्धामुळे आधीच इंधनपुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम झाल्याने युरोपीय देश त्रासलेले आहेत. आता आखाती देशांतून होणाऱ्या इंधनपुरवठ्यावर परिणाम झाला, तर त्यांची स्थिती आणखी खराब होईल. शिवाय, युद्धाचा भडका उडला तर आधीच अशांत लाल समुद्रामुळे विस्कळीत झालेली युरोप आणि आखाती देशातील भारताची व्यापारी मालाची वाहतूक अधिक खर्चिक होऊ शकते.


पश्चिम आशियातील राजकारणात अत्यंत महत्त्वाकांक्षी देश म्हणजे इराण. अमेरिका व इस्राईल हे आपले शत्रू असल्याचे इराणने जाहीर केलेच आहे. आयातुल्ला खोमेनी यांच्या नेतृत्वाखाली १९७९ मध्ये झालेल्या 'धार्मिक क्रांती'नंतर या 'इस्लामिक क्रांती'चे रक्षण करण्यासाठी रिव्होल्युशनरी गार्ड (आयआरजीसी) स्थापन करण्यात आले. या पथकातील सैनिकांची बांधिलकी इराणच्या मुख्य लष्कराशी नव्हे तर धर्मगुरूंशी आहे. आजही इराणचे मुख्य सैन्य आणि हे रिव्होल्युशनरी गार्ड हे दोघे समांतर रीतीने काम करतात. एक लाख नव्वद हजार प्रशिक्षित सैनिक 'आयआरजीसी'कडे आहेत.

इराणच्या भू, सागरी आणि हवाई सीमांचे संरक्षण करण्याबरोबरच संपूर्ण पश्चिम आशियात 'शियापंथीयांचे जाळे' मजबूत करण्याचे काम या सैन्यावर सोपविलेले आहे. सीरियाच्या बशर अल असद या सत्ताधीशाविरुद्धच्या असंतोषातून झालेल्या यादवीत 'आयआरजीसी'ने 'हिज्बुल्ला' आणि रशियाच्या मदतीने असद यांची तळी उचलून धरली.

# ‘लोन ॲप’वरुन विळखा ’सेक्सटॉर्शन’चा; पवई, गिरगाव, ओशिवरामध्ये दोन तरुणींची फसवणूक

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

कागदपत्रांच्या अटींविना झटपट कर्ज देण्याची जाहिरातबाजी करणाऱ्या ‘लोन ॲप’वरून ‘सेक्सटॉर्शन’ करण्याच्या घटना पुन्हा वाढल्या आहेत. मुंबईत दोन दिवसांत गिरगावच्या चिरा बाजार, पवई आणि ओशिवरा परिसरात २५ ते ३० वर्षांच्या तरुणी ‘सेक्सटॉर्शन’च्या बळी ठरल्या आहेत. ‘मॉर्फिंग’ केलेले अश्लील फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी या तरुणींना देण्यात आली. या तरुणींच्या तक्रारीवरून स्थानिक पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले. अंधेरी पूर्वेतील एका २५ वर्षीय तरुणीने इंस्टाग्रामवर ‘लोन ॲप’ची जाहिरात पाहिली. त्यातील लिंकवर ‘क्लिक’ करून तिने ओळखपत्र आणि वैयक्तिक माहितीचा इतर तपशील भरला. त्यानंतर तिच्या बँक खात्यावर १८०० रुपये आले. तिला अधिक रक्कम कर्ज म्हणून हवी होती. त्यामुळे तिने या रकमेची तत्काळ परतफेड केली. परतफेड करूनही ‘ॲप’च्या प्रतिनिधींकडून पैसे पाठविण्यासाठी तगादा सुरू होता. या तरुणीने पैसे पाठविण्यास नकार देताच ॲपच्या कथित प्रतिनिधीने तिचे अश्लिल फोटो आणि व्हिडिओ नातेवाइकांना पाठवले. तरुणीने पैसे न पाठवता याबाबत पवई पोलिस ठाण्यात



तक्रार केली. चिरा बाजार येथील रूपाली (बदललेले नाव) हिने दहा हजारांची गरज असल्याने ‘लोन ॲप’ डाउनलोड करून त्यामध्ये तपशील भरला. रूपालीच्या बँक खात्यावर २३६० रुपये जमा झाले. मात्र, ३० सेकंदात ही रक्कम परत करण्याचा संदेश तिला आला. इतक्या झटपट रक्कम परत करायची असते, तर कर्ज घेतलेच नसते, असे तिने प्रतिनिधीला कळविले. यावर काहीही न बोलता त्याने रूपालीचे मॉर्फिंग केलेले अश्लिल फोटो आणि व्हिडिओ नातेवाइक आणि मैत्रिणींना पाठवले. त्यामुळे घाबरून न जाता तिने लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाण्यात तक्रार केली. एका खासगी कंपनीत नोकरी करणाऱ्या २७ वर्षीय रोझी (बदललेले नाव) हिला एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. ॲपवरून घेतलेले कथित ३७०० रुपयांचे कर्ज तत्काळ भरण्यास तिला सांगितले. रोझी हिने कर्ज घेतलेच नसल्याचे सांगितले. त्यावर फोन करणाऱ्याने तिला तिच्या मोबाइलमधील संपर्क क्रमांकाची यादी पाठवून या सर्वांना तुझे फोटो आणि व्हिडिओ पाठवतो, असा संदेश पाठवला. त्यानंतर त्याने रोझीला तिचे अश्लील व्हिडिओ पाठवले आणि पैसे न भरल्यास ते सर्वांना पाठविण्याची धमकी दिली. तरीही रोझीने पैसे न दिल्याने त्याने तिच्या मत्रिणींना हे व्हिडिओ पाठवले.

## पाच वर्षीय मुलीवर अत्याचार; पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

■ **नेरुळ: विशेष प्रतिनिधी**

नेरूळमधील दारावे गावात राहणाऱ्या पाच वर्षीय मुलीला




बॉल देण्याच्या बहाण्याने इमारतीच्या जिन्याखाली अनैसर्गिक लैंगिक कृत्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नेरूळ पोलिसांनी पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.नेरूळमधील दारावे गावात शुक्रवारी दुपारी दीडच्या सुमारास घराबाहेरील मोकळ्या जागेत खेळणाऱ्या पाच वर्षांच्या मुलीला अज्ञात व्यक्तीने बॉल देण्याच्या बहाण्याने बाजूलाच असलेल्या इमारतीच्या जिन्याखाली अनैसर्गिक लैंगिक कृत्य करण्याचा प्रयत्न केला होता.

## सहा लाखाचा प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त, नाशिक पोलिसांची कारवाई

■ **नाशिक: विशेष प्रतिनिधी**

दिंडोरीरोडवीरल कलानगर येथील गुरुमाऊली बंगला येथे पोलिसांनी छापा टाकून ६ लाख ६० हजार ६० रुपयाचा प्रतिबंधित असलेला पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला. हा साठा अवैधपणे साठवून ठेवला असल्याची माहिती पोलिसांनी मिळाल्यानंतर त्यांनी ही कारवाई केली. पोलीस आल्याची चाहुल लागताच संशयित भास्कर गरड हा पळून गेला. या बंगल्याची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्यात वेगवेगळया रंगाचे प्लॅस्टीक गोण्या व खाकी रंगाचे बॉक्स



दिसून आले. त्यांची पहाणी करता त्यात विमल पान मसाला, मिराज किर, काकील टोबॅको, वाह पानमसाला, व्ही-१ टोबॅको, डब्ल्यु चॅव्यींग टोबॅको असे प्रतिबंधीत असलेला एकुण ६,६०,०६० रुपये किंमतीचा पानमसाला व तंबाखू मिळून आला. या छाप्यानंतर भास्कर गरड याचे विरूध्द पोहवा देवराम चव्हाण यांनी तक्रार दिली आहे. या तक्रारीवरुन म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदरचा माल कोठून आणला व त्याची विक्री कोठे होणार होती याबाबत तपास चालु आहे.

## घरगुती गॅसचा काळाबाजार करणाऱ्यावर गुन्हे शाखेची कारवाई, सव्वा तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

घरगुती वापरासाठी लागणाऱ्या गॅस सिलिंडरचे दर दिवसागणिक वाढत असताना, दुसरीकडे याच घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात सुरु आहे. पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यावर कारवाई करुन तीन लाख २० हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शुक्रवारी दुपारी दीडच्या सुमारास बिजलीनगर केली. याप्रकरणी मुकेश सुरेश पवार (वय २४ रा. बिजलीनगर) या दुकान चालकावर आयपीसी २८५, २८६ सह जिवनावश्यक वस्तुंचा कायदा १९५५ चे कलम ३, ७ सह स्फोटक पदार्थ अधिनियम सन १९०८ चे कलम ५ नुसार गुन्हा दाखल गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई सदानंद रुद्राक्षे यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुकेश पवार हा बिजलीनगर झोपडपट्टी बस स्टॉपजवळ मल्हार गॅस सर्विस व होम अप्लायंसेस नावाचे दुकान चालवतो. त्याच्याकडे कोणतीही परवानगी नसताना घरगुती



वापराचे भरलेले गॅस सिलिंडर मधून रिफीलच्या सहाय्याने अवैधरित्या लहान सिलिंडरमध्ये गॅस भरून त्याची चढ्या दराने विक्री करत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. याबाबत माहिती मिळताच अंमली पदार्थ विरोधी पथकाने छपा टाकून ३ लाख २० हजार ११०. रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये २९ घरगुती वापराचे सिलिंडर, ३ व्यावसायिक व ७२ लहान गॅस सिलिंडर, टेम्पो, रिफिलींग करण्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले आहे.

# डोंबिवलीतील पलावा गृहसंकुलात दोन भावांकडून बांगलादेशमधील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

■ **डोंबिवली: विशेष प्रतिनिधी**

डोंबिवली जवळील पलावा-खोणी गृहसंकुलातील जॅस्मिन सोसायटीत दोन भावांनी बांगलादेशमधून घर सांभाळण्यासाठी ठेवलेल्या एका १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर आळीपाळीने राहत्या घरात अत्याचार केले. या मुलीला बाहेरील हॉटेलमध्ये नेऊन तिला जबरदस्तीने देहविक्रय करण्यासाठी भाग पाडल्याचा प्रकार या अल्पवयीन मुलीच्या मानपाडा पोलीस ठाण्यातील तक्रारीवरून उघडकीला आला आहे. राज उर्फ सतीश राजेश रजत, सचीनकुमार विजय रजत अशी दोन्ही भावांची नावे आहेत. याशिवाय इतर तीन जणांनी पीडितेवर विविध हॉटेलमध्ये सतीशच्या पुढाकाराने लैंगिक अत्याचार केला आहे. फेब्रुवारी महिन्यात हा प्रकार घडला आहे.

पोलिसांनी सांगितले, पीडित मुलगी ही



बांगलादेशमधील बागेरहाट जिल्ह्यातील एका गावातील रहिवासी आहे. ती या जिल्ह्यातील एका गावात आपल्या मजुरी करणाऱ्या आईसह राहत आहे. मुलीचे शिक्षण पाचवीपर्यंत झाले आहे. तिला फक्त बंगाली भाषा येते. दोन महिन्यांपूर्वी फेब्रुवारीमध्ये पीडितेची मावशी मुंबईतून पश्चिम बंगालमध्ये आली. ती पीडितेच्या घरा शेजारी राहते. तिने पीडितेच्या आई, मुलीला सांगितले मी मुंबईजवळील एका शहरात राहते. तेथे दागिन्यांना कलाकुसर करण्याची कंपनी आहे. त्या कंपनीत ३० हजार रुपये पगार मला मिळतो. तुम्ही तेथे आलात तर तुम्हालाही रोजगार मिळेल. पीडिता आणि तिच्या आईने मावशीसोबत मुंबईत येण्याची तयारी केली. जवळ पारपत्र नसल्याचे पीडितेने सांगितले. त्यावेळी मावशीने सांगितले, तुम्ही काळजी करू नका तुम्हाला बांगलादेश कलिगंज येथे एक इसम भारतीय हद्दीत घुसविण्याचे काम करील. तीन इसमांनी आम्हाला बांगलादेश-भारतीय हद्दीमधील गुप्तरित्या असलेल्या मलनिस्सारणच्या एका मोठ्या वाहिनीमधून भारतीय हद्दीत सोडले. तेथे बिश्टी इसमाने पीडितेला तिच्या आई, मावशीला हावडा मुंबई एक्सप्रेसने कल्याण रेल्वे स्थानकात उतरण्याची सोय केली.

## पिंपरी चिंचवडमध्ये नवजात बालकांची तस्करी करणारी महिलांची टोळी गजाआड; सात दिवसांच बाळ...

■ **पिंपरी: विशेष प्रतिनिधी**

चिंचवडमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. नवजात बालकांची तस्करी करणाऱ्या टोळी चा वाकड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी सहा महिलांना वाकड पोलिसांनी अटक केली असून त्यांना १६ एप्रिल पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. सहा आरोपी महिलांमध्ये एक परिचारिका असून ती मुख्य सूत्रधार असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी- चिंचवड शहरातील वाकड परिसरात नवजात बालकांची तस्करी करणारी टोळी सक्रिय असल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली होती. काही महिला जगताप डेअरी या ठिकाणी नवजात बालक विकण्यासाठी येणार असल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली. त्या ठिकाणी सापळा रचला. १२ एप्रिल रोजी दुपारी सव्वाचार च्या सुमारास दोन रिक्षातून सहा महिला उतरल्या,

आरोपी महिला अवघ्या सात दिवसांच नवजात बालक विकण्यासाठी आल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं. धक्कादायक बाब म्हणजे



त्यांच्याकडे सात दिवसांच नवजात बालक होतं. संशय बळावल्याने महिलांना वाकड पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं. पोलिसांनी नवजात बालका विषयी विचारपूस केल्यानंतर महिलांना समाधानकारक उत्तर देता आलं नाही. वाकड पोलिसांनी सहा महिलांना पोलीस ठाण्यात नेऊन त्यांच्याकडे अधिक चौकशी केली. याआधी देखील या महिला आरोपींनी पाच नवजात बालक विकल्याचं पोलीस चौकशीत उघड झाल आहे. महिला आरोपींमध्ये एक परिचारिका असून ती खाजगी रुग्णालयात काम करते. आर्थिक परिस्थिती नाजूक असलेल्या पालकांना हेरून परिचारिका त्यांना पैशाचं अमिश दाखवून नवजात बालक विकत घ्यायची.

## दुचाकी वाहने चोरणाऱ्या टोळीकडून सात वाहने हस्तगत, बिबवेवाडी पोलिसांची कामगिरी

■ **बिबवेवाडी : विशेष प्रतिनिधी**

मौजमजेसाठी दुचाकी चोरणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांसह एकाला चोरलेली वाहने विकण्या अगोदरच बिबवेवाडी




पोलिसांनी ताब्यात घेतले. चोरलेल्या वाहनांचा तपास करत असताना बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस अंमलदार प्रणय पाटील व अभिषेक धुमाळ यांना मिळालेल्या माहितीनुसार गोपीनाथ नगर,वरवंड, तालुका दौंड येथील दोन विधीसंघर्षित मुलांनी दुचाकी चोरल्याची माहिती मिळाली त्यानुसार तपास करीत असताना मुले सूरतगाव, ता.तुळजापूर, जिल्हा धाराशिव येथे राहत असल्याची माहिती त्यानुसार त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता आरोपी ओंकार साळुंखे वय १९, रा बोळी, ता. खंडाळा, जिल्हा सातारा याला अटक करून साडेतीन लाख रुपये किमतीची सात वाहने विकण्या अगोदरच हस्तगत केली. सदरील गुन्ह्याचा तपास सहा,पोलीस आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, पोलीस निरीक्षक गुन्हे मनोजकुमार लोंढे, सहा. पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे, शामराव लोहमकर, अभिषेक धुमाळ यांनी केली.

## मंगळवेढा पोलिसांची महामार्गावर तपासणी: मद्य, बोलेरोसह ६ लाख ४३ हजार ८८० चा ऐवज हस्तगत

■ **मंगळवेढा : विशेष प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील मंगळवेढ्याच्या सिमेवरील पोलिसांच्या तपासणी नाक्यावर ६ लाख ४३ हजार ८८० रुपयांच्या बेकायदेशीर दारूसह वाहन जप्त केले. फिर्याद पोहेकॉ सैफुल अब्दुल रसिद अन्सारी यांनी दिली, चाळीस धोंडा येथे मंगळवेढा पोलीस एस.एस.टी. पॉईट जवळ येणारी व जाणाऱ्या वाहनांची तपासणी करीत असताना ,यातील आरोपी नामे प्रकाश चुडाप्पा शिंदे यांने आपले ताब्यातील बोलेरो क्रमांक एम.एच.४५ ए.एल.८४१७ हा गाडीत वेगवेगळया प्रकारच्या इंग्लिश दारूच्या १ लाख ५३ हजार ८८० रुपयाच्या बाटल्याचे बॉक्स विनापरवाना अवैधरित्या



शिवाय गाडीतुन घेवून जात असताना ,पोसई शेख यांनी अडविण्याचा प्रयत्न केला असता त्याने,हाताने धक्काबुकी करुन ढकलुन देवुन शासकीय कामात अडथळा करुन तेथुन बोलेरो गाडी घेवुन हायवे रोडने विरुध्द बाजुने पळुन गेले.

पोलिसाच्या पथकाने त्यास पाठलाग करुन सांगोला शहरातील धनगर गल्ली येथे सांगोला पोलीस व मंगळवेढा पोलीस यांच्या पथकाने पकडले ,वरील तिघा आरोपी विरुद्ध शासकीय कामात अडथळा आणला, बेदरकारपणे वाहन चालविणे व अवैध दारू वाहतूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे, गुन्हातील बोलेरो जीप जप्त करण्यात आली आहे. सदरची कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक रणजीत माने, पोसई सलीम शेख, पोहेकॉ सैफन अन्सारी, पोहेकॉ दिंगबर गेजगे, पोकॉ संतोष चव्हाण, चापोकॉ राजाराम तानगावडे यांच्या टिमने केली. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे करीत आहे.

# भविष्य सांगण्याच्या बहाण्याने भूतकाळात ढकललं, सहा लाखांचे दागिने घेऊन ज्योतिषी फरार

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

**दिवस-रात्र मेहनत करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या पालिकेतील एका कंत्राटी कामगाराला एक ज्योतिषी भेटला. हात पाहिल्यावर, ‘तुला ईडापिडा सतावत असून बरकतीसाठी तीन पूजा कर’ असा सल्ला त्याने दिला. घरी येऊन दोन पूजा केल्या आणि तिसऱ्या पूजेला हा ज्योतिषी कामगाराकडचे सहा लाखांचे दागिने घेऊन फरार झाला.**

ॲटॉप हिल येथे वास्तव्यास असलेला मंगेश पालिकेत कंत्राटी कामगार म्हणून नोकरी करतो. मुलींसाठी दुकानावर खाऊ आणायला गेला असताना त्याला एक दाम्पत्य भेटले. त्यांनी आपण हात पाहून भविष्य सांगत असल्याचे मंगेशला सांगितले. यासाठी किती खर्च येईल अशी विचारणा मंगेशने केली. केवळ ३० रुपयांत तुझे भविष्य सांगतो, असे हे दोघे म्हणाले. फक्त ३० रुपयांत भविष्य जाणून घेण्याची संधी असल्याने मंगेशने होकार दिला. दोघांनाही घेऊन मंगेश घरी गेला. ज्योतिषाने मंगेशचा हात पाहिला आणि ‘तू मेहनत घेतोस मात्र तुझ्या आयुष्यात बरकत येत नाही. तुला ईडापिडा सतावत आहे’ असे या ज्योतिष्याने सांगितले. ईडापिडा घालविण्यासाठी काय करावे लागेल अशी विचारणा मंगेश याने करताच, यासाठी



पूजा घालावी लागेल आणि त्यासाठी दीड हजार रुपये खर्च येईल, असे त्याने सांगितले. मंगेश याने पूजा करण्याची तयारी दर्शवली आणि पूजा करण्यास दीड हजार रुपये दिले. ही पूजा एकदाच नसून तीनदा घालावी लागेल, असे या दाम्पत्याने सांगितले. दोनच दिवसांनी भविष्य सांगणारा आणि त्याच्याबरोबर असलेली महिला घरी आली त्यांनी पूजा अर्चा केली आणि निघून गेले. दुसऱ्यांदा देखील त्यांनी तेच केले आणि तिसऱ्यांदा महिला न येता ज्योतिषी एकटाच आला. त्याने पूजा सुरू केली आणि मंगेशला, ‘तू या पूजेच्या वेळी घरात थांबू नकोस’ असे सांगितले. त्यानुसार मंगेश इमारतीखाली जाऊन उभा राहिला. ही संधी साधत ज्योतिषाने मंगेशच्या पत्नीला घरातील सर्व दागिने आणण्यास सांगून ते पूजेजवळ ठेवले. कपड्याचे एक गाठोडे केले आणि त्यामध्ये हे दागिने बांधले. ‘नऊ दिवसांनी हे गाठोडे उघडा, तुमची भरभराट होईल’ असे तो म्हणाला.

या पूजेनंतर ज्योतिषाने सांगितल्याप्रमाणे मंगेश आणि त्याची पत्नी मंदिरात जाऊन आली. मंगेशने पत्नीला गाठोड्याबाबत विचारला असता त्यामध्ये दागिने बांधून ठेवले असल्याचे ती म्हणाली. मंगेशला संशय आल्याने त्या गाठोडे उघडून पहिले असता आतमध्ये दागिने नव्हते.

## दागिने लंपास करणाऱ्या दोन भामट्यांना अटक, ठाणे आणि मुंबईतील १६ गुन्हे उघडकीस

■ **ठाणे: विशेष प्रतिनिधी**

बोलण्यात गुंतवून अंगावरील सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या दोन भामट्यांना ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या उल्हासनगर युनीटने अटक केली असून त्यांच्याकडून ठाणे आणि मुंबई परिसरातील एकूण १६ गुन्हे उघडकीस आले आहेत. अशा स्वरुपाच्या फसवणुकीच्या गुन्ह्यात दोघांना यापुर्वी सुद्धा अटक झाली होती आणि तीन महिन्यांपुर्वी कारागृहातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी पुन्हा असे गुन्हे करण्यास सुरूवात केली होती, अशी माहिती तपासात पुढे आली आहे. अनिल कृष्णा शेट्टी (४३) आणि रमेश विजयकुमार जयस्वाल (४७) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. हे दोघे अंबरनाथ तालुक्यातील भालगाव परिसरात राहतात. ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरातील बाजारपेठ, सार्वजनिक रस्ता अशा



ठिकाणी नागरिकांना बोलण्यात गुंतवून भामटे त्यांच्याकडील दागिने लंपास करीत असल्याच्या घटना वाढू लागल्या होत्या. याप्रकरणी नौपाडा, उल्हासनगर, बदलापुर पुर्व, शिवाजीनगर, अंबरनाथ, विठ्ठलवाडी, महात्मा फुले चौक, डोंबिवली तसेच जिल्ह्यातील इतर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

परंतु आरोपी गुन्ह्याची आणि राहण्याची जागा सातत्याने बदलत असल्यामुळे त्यांना पकडणे शक्य होत नव्हते. या प्रकरणाचा संमातर तपास ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या उल्हासनगर युनीटचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक अशोक कोळी यांच्या पथकाने सुरू केला होता. या पथकाने तपास करून अनिल आणि रमेश या दोघांना अटक केली. या दोघांनी ठाणे पोलिस आयुक्तालय क्षेत्रात ११ तर, मुंबई शहरात ६ असे एकूण १६ गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले आहे, अशी माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली.

# अंधेरी सब वे पूरमुक्त करण्यासाठी आणखी २०९ कोटी, किमान तीन वर्षे लागणार

■ मुंबई: सम्यक कासारे

पावसाळयात अंधेरी सब वेमध्ये पाणी साचू नये म्हणून पालिका प्रशासनाने विविध कामे हाती घेतली असून पाण्याचा निचरा वेगाने करण्यासाठी सब वेला समांतर रेल्वे रुळांखालून पर्जन्य जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. तसेच नाला रुंदीकरणाची व नाला वळवण्याचीही कामे हाती घेण्यात येणार असून या कामासाठी सुमारे २०९ कोटी खर्च येणार आहे. ही सर्व कामे पूर्ण होण्यास तीन ते चार वर्षे लागणार असून तोपर्यंत पाणी अंधेरी सब वेमध्ये पावसाचे पाणी साचल्यास वाहतूक थांबवणे हाच एकमेव पर्याय असणार आहे. आधीच मोगरा उदंचन केंद्रासाठी २५० कोटी रुपये खर्च अपेक्षित असताना आणि ते काम रखडलेले असताना आता आणखी २०९ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

मुसळधार पाऊस पडल्यानंतर अंधेरी सब वे, मिलन सब वेसह विविध ठिकाणच्या सखलभागात पाणी साचते. पावसाळ्यात मिलन सब वेमध्ये पाणी साचू नये म्हणून साठवण टाकी बांधण्याचे काम पूर्ण झाले असले तरी अंधेरी सब वे मात्र यंदाच्या पावसाळ्यात पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. अंधेरी पश्चिम परिसरातील मोगरा नाल्याची रुंदी बऱ्याच ठिकाणी कमी असल्यामुळे पाऊस पडत असताना व भरतीची वेळी मोगरा नाल्याच्या पाण्याची पातळी वाढते व त्यालगत असलेल्या अंधेरी सब वे, दाऊद बाग, आझाद नगर, वीरा देसाई रोड या परिसरांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन जीवित, तसेच मालमत्तेची हानी होते. हा परिसर बशीसारखा असल्यामुळे पाण्याचा निचराही होण्यास वेळ लागतो. अंधेरी पश्चिम भागातील




पावसाचे पाणी अंधेरी सब वे मार्गे मोगरा नाल्यामधून वाहून पुढे मिल्लत नगर, लोखंडवाला कॉम्प्लेक्सजवळ मालाड खाडीमध्ये विसर्जित होते. या परिस्थितीचा अभ्यास करून पालिकेने मोगरा नाल्याचे रुंदीकरण करण्याचे ठरवले आहे. तसेच जिथे नाल्याचे रुंदीकरण करणे शक्य नाही अशा ठिकाणी नाला वळवून पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. अंधेरी सब वे परिसर सखल भाग असून जवळच मोठा उतार असल्यामुळे ताशी ५० मिमी पाऊस पडतो तेव्हा प्रति सेकंद ५० हजार लिटर पाणी वेगाने वाहत येते. त्या तुलनेत नाल्याची रुंदी कमी असल्यामुळे पाणी साचते. त्यामुळे नाल्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे, असे पर्जन्य जलवाहिन्या विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. नाल्यातील पाणी पुढे मोगरा उदंचन केंद्रापर्यंत नेऊन मग समुद्रात सोडले जाणार आहे. मात्र मोगरा उदंचन केंद्राचे काम रखडले आहे. परंतु, तोपर्यंत पहिल्या टप्प्यातील कामांसाठी लवकरच निविदा मागवण्यात येणार आहेत. सध्या लोकसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू असून त्यानंतर निविदा मागवण्यात येतील. त्यामुळे प्रत्यक्षात पावसाळ्यानंतरच ही कामे सुरू होऊ शकणार आहेत. रेल्वे रुळांखालून नवीन पर्जन्य जलवाहिनी टाकण्याचे काम क्लिष्ट असून ते पूर्ण होण्यास तीन ते चार वर्षे लागू शकतात. त्यामुळे पुढील किमान तीन पावसाळे तरी अंधेरी सब वे परिसराला दिलासा मिळू शकणार नाही.

## महामार्गावरील बंद भुयारी मार्गाचा ताबा फेरीवाल्यांकडे, पालिकेने केली कारवाई

■ नवी मुंबई: धनश्री सट्टा

**सायन-पनवेल महामार्गावरील नेरुळ येथील पादचारी भुयारी मार्ग बंद आहेत. या पादचारी पुलाचा ताबा फेरीवाल्यांनी घेतला असून या ठिकाणी साहित्य ठेवले जात होते. महापालिकेने या फेरीवाल्यांवर कारवाई केली असून वापर नसलेल्या पादचारी भुयारी मार्गाला टाळे लावले आहे.**

सायन-पनवेल महामार्गाचे रुंदीकरणाचे काम करताना महामार्ग ओलांडणाऱ्या नागरिकांचे अपघात टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून नेरुळ परिसरात चार भुयारी मार्ग बांधण्यात आले होते. यामध्ये एलपी जंक्शन येथे २, एस.बी.आय.कॉलनी आणि उरण फाटा येथे प्रत्येकी एक भुयारी मार्ग बांधण्यात आले होते. परंतु या मार्गाचे काम अर्धवट असल्याने या भुयारी मार्गाचा नागरिकांना वापर करता येत नव्हता. भुयारी मार्ग वापरात यावेत यासाठी २०१८ साली महापालिकेने या चारही भुयारी मार्गाच्या दुरुस्तीच्या कामासाठी पुढाकार घेत सुमारे ४३ लाख रुपये खर्च केले होते.




यामध्ये भुयारी मार्गात साचणाऱ्या पाण्यासाठी विद्युत पंप बसविणे, भिंतींना प्लास्टर करणे, छतास पॉली कार्बोनेट शीट बसविणे, फ्लोरिंग, पायऱ्या तसेच भिंतींच्या टाइल्सची दुरुस्ती करणे, भुयारी मार्गाला जोडणाऱ्या पदपथांची कामे करणे, प्लम कॉंक्रीट करणे, रंगकाम करणे, माहिती फलक बसविणे, परिसराची स्वच्छता करणे आदी कामांचा समावेश होता. महापालिकेने काम केल्यावर देखील हे भुयारी मार्ग वापरात आले नाहीत. त्यानंतर यामधील साहित्याची देखील चोरी झाल्याचे प्रकार घडले होते. एलपी येथे नागरिकांची वर्दळ असली तरी शॉर्टकट मारण्यासाठी नागरिक रस्ते ओलांडणे पसंत करतात. तसेच एसबीआय कॉलनी आणि उरण फाटा येथे नागरिकांची वर्दळ नसल्याने या ठिकाणचे भुयारी मार्ग देखील ओस पडले होते. त्यानंतर या भुयारी मार्गाचा ताबा मद्यपी आणि गर्दुल्यांनी घेतला होता. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेने या भुयारी मार्गाला टाळे बसविले होते. नेरुळ एलपी येथील भुयारी मार्गाचे टाळे तोडून काही फेरीवाले या जागेचा वापर साहित्य ठेवण्यासाठी करत असल्याने महापालिकेने या भुयारी मार्गाला पुन्हा टाळे बसविले आहे.

## भाजपाचा जाहीरनामा म्हणजे 'फेकूनामा'; जनता 'चुनावी जुमलेबाजी'ला फसणार नाही, नाना पटोलेंची सडकून टीका

■ मुंबई: माधव अलवा

सत्तेत असताना १० वर्ष शेतकरी, छोटे व्यापारी, तरुणांना वाऱ्यावर सोडणाऱ्या भारतीय जनता पक्षाला लोकसभेच्या निवडणुकीत पुन्हा त्यांची आठवण झाली असून जाहीरनाम्यात त्यांचा उल्लेख केलेला आहे. भाजपने नोकरीच्या नावाने देशातील तरुणांना फसवले, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करतो म्हणून शेतकऱ्यांना फसवले, जीएसटीच्या माध्यमातून छोटे व्यापारी व जनतेला फसवून अदानीचे खिसे भरले आणि पुन्हा याच घटकांना फसवण्याचा प्रयत्न भाजपा करत आहे. भाजपाचा जाहीरनामा म्हणजे 'फेकूनामा' असून जनता आता भाजपाच्या या 'चुनावी जुमलेबाजी'ला फसणार नाही, असा हल्लाबोल महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना नाना पटोले म्हणाले की, मोदी सरकारने मागील १० वर्ष फक्त अदानीसाठी काम केले. हे सरकारच अदानी सरकार होते पण जाहीरनाम्यात अदानीचा हिस्सा असायला हवा होता ते मात्र दिसत नाही. समान नागरी कायद्याचे आश्वासन तर मागील निवडणुकीतही दिले होते मग आतापर्यंत भाजपाने त्याची



अंमलबजावणी का केली नाही, त्यांना कोणी रोखले होते का? असा सवाल पटोले यांनी केला.वन नेशन, वन इलेक्शन म्हणजे पुन्हा निवडणुकाच घेणार नाही असे आहे. २०१४ व २०१९ मध्ये भाजपाने जे सांगितले तेच मुद्दे आजच्या जाहीरनाम्यात आहेत. जनता आता भाजपाच्या फसव्या आश्वासनांना बळी पडणार नाही. लोकसभा निवडणुकीत भाजपाला घरी बसवण्याचा संकल्प जनतेने केला आहे.

## दत्तात्रेय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालयात Roadmap To IT industry विषयावर कार्यशाळा संपन्न



■ पुणे : विशेष प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने १३ एप्रिल रोजी इन्फिनिटी फाउंडेशनच्यावतीने भिमाशंकर शिक्षण संस्थेच्या दत्तात्रेय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालय, दत्तात्रेय नगर परगाव अवसरी बु. तालुका-आंबेगाव जिल्हा- पुणे इथे 'Roadmap to the IT Industry' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. मेजर शत्रुघ्न थोरात सर लाभले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष संकेत भोकरे यांनी नविन कौशल्य आत्मसात करण्यासाठी आवाहन केले. तसेच इन्फिनीटी फाउंडेशनच्या विविध उपक्रमांची माहिती सांगितली. रक्तयोद्धा या उपक्रमाची ओळख करून दिली आणि रक्तदान करण्यासाठी वर्षभरात किमान एकदा तरी सर्वांनी पुढे यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. सुभोदीप चौधरी यांनी Non-technical शिक्षणाच्या लोकांना आयटीमध्ये करिअर कसे करता येईल याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. तसेच अमोल खैरे आणि अमोल लतके यांनी आयटीच्या विविध सॉफ्टवेअरची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. कार्यक्रमात एकूण ७६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन Zoology विभागाचे प्रमुख प्रा. शिंदे यांनी केलं.

## झाडांवर किती दिवस दीपमाळा गुंडाळायच्या? उच्च न्यायालयाचा सवाल

■ ठाणे: तृप्ती गोरे

गुढीपाडवा, दसरा, दिवाळी अशा वेगवेगळया सणांच्या वेळी गल्लोगल्ली रोषणाई करण्याची हौस वाढली आहे. झाडांवर दिव्यांच्या माळा सोडायच्या किंवा झाडांना दीपमाळा गुंडाळायच्या आणि परिसरात झगमगाट करायचा, हे करण्याकडे राजकीय नेते व महापालिकेचा कल आहे. ठाण्यातील दक्ष नागरिक रोहित जोशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे. झाडांवर पक्षी, कीटक व काही प्राणी वास्तव्य करतात. त्यांच्या जीवनचक्रात या रोषणाईमुळे हस्तक्षेप होतो. प्रखर दिव्यांमुळे त्यांना त्रास होतो. अनेकदा अशा रोषणाईमुळे पक्षी या झाडांवर घरटी करत नाहीत. दिव्यांच्या रोषणाईच्या प्रखर प्रकाशाने काही कीटक, सरडे यांना हानी पोहोचते.

माणूस हा शक्तिशाली असल्याने तो आपल्याला अनुकूल अशा निर्णयांची अंमलबजावणी करताना आजूबाजूच्या जीवसृष्टीवर



आपल्या निर्णयांचा काय परिणाम होईल, याचा विचारही करीत नाही. अनेक छोटे कीटक, सरपटणारे प्राणी हे तर अनेकांच्या खिजगणतीतच नसतात. साहजिकच अशा मंडळींना जोशी यांची याचिका अनावश्यक वाटू शकते. ठाणे शहर सणासुदीला सजले असताना त्यात अपशकुन करण्याचा हा प्रयत्न असल्याची काहींची भावना असू शकते. आमच्याच सणांच्या वेळी हे जैवविविधता प्रेम का उफाळून येते, असा अगोचर सवाल करण्याची फॅशन हल्ली वाढली आहे. मात्र त्याला काही अर्थ नाही. शहरीकरणाच्या रेट्यात अनेक पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी यांचे अस्तित्व आपण संपवत आहोत. ज्याप्रमाणे माणसाने बिबट्यांच्या अधिवासात घुसखोरी केल्यामुळे बिबटे मानवी वस्तीत येण्याच्या घटना वाढल्या आहेत. तसाच हा रोषणाईचा सोस आहे. अनेक हॉटेल, रिसॉर्ट आपले ब्रँडिंग होऊन ग्राहकांनी आपल्याकडे यावे याकरिता आपल्या प्रवेशद्वारालगत असलेल्या झाडांवर बारा महिने चोवीस तास रोषणाई करतात. गेल्या काही वर्षात गणेशोत्सव, नवरात्रोत्सवात भर रस्त्यात मंडप घालून सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. अशा वेळी या झाडांवरच हॅलोजन चढवले जातात. अत्यंत प्रखर प्रकाशामुळे त्या झाडावरील पक्ष्यांची घरटी, सरडे, काही कीटक हे पोळून नष्ट होतात; पण कंबर मोडून नाचण्याच्या किंवा गरबाच्या उन्मादात याची जाणीव कुणालाच होत नसेल.

## १० पैकी ४ रूग्णांची उच्च रक्तदाब तपासणी करण्यास टाळाटाळ! अनियंत्रित उच्च रक्तदाबामुळे हृदयविकार व स्ट्रोकचा धोका...

■ मुंबई: सचिन कदम

भारतीयांमध्ये उच्च रक्तदाबाच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, उच्च रक्तदाब असलेल्या १० पैकी ४ लोक रक्तदाबाची नियमित तपासणी करत नाहीत. अशा लोकांना हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका अधिक असतो. १८-५५ वयोगटातील ४० टक्के लोकांना त्यांच्या रक्तदाबाविषयी माहितीच नसते. अशा रूग्णांनी रक्तदाबाची नियमित तपासणी करणे, सोडियमचे प्रमाण कमी असलेला आहार घेणे, व्यायाम करणे, तणावमुक्त राहणे आणि उच्च रक्तदाबाचा सामना करण्यासाठी वजन नियंत्रित राखणे आवश्यक आहे, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. 'नॅशनल सेंटर ऑफ डिसीज इन्फॉर्मेटिक्स अँड रिसर्च' व 'जर्नल ऑफ पब्लिक हेल्थ' मध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासानुसार, भारतातील १८ ते ५४ वयोगटातील १० पैकी ४ लोकांनी त्यांच्या रक्तदाबाचे परीक्षण केले नाही. लीलावती



हॉस्पिटलचे इंटरनल मेडिसिन एक्सपर्ट डॉ. सी. सी. नायर म्हणाले की, उच्च रक्तदाब हा सामान्य पातळीपेक्षा जास्त असला तर तो सायलेंट किलर ठरतो. ही एक धोकादायक स्थिती आहे कारण एखाद्याचा रक्तदाब सतत १८०/१२० एमएमएचजीपेक्षा जास्त असल्यास त्या व्यक्तीचे डोके दुखणे, छातीत धडधड किंवा नाकातून रक्तस्त्राव यांसारखी लक्षणे उद्भवतात. उच्च रक्तदाबाच्या कारणांमध्ये सोडियमचे प्रमाण अधिक असलेला आहार, ताणतणाव, शारीरिक हालचालींचा अभाव, वय, अल्कोहोलचे सेवन, तसेच ठराविक औषधे आणि स्लीप एपनिया, लठ्ठपणा आणि धूम्रपान यांचा समावेश आहे. १० पैकी ४ उच्च रक्तदाब असलेले रुग्ण त्यांच्या रक्तदाब पातळी तपासणे टाळतात. अशा लोकांना हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकची शक्यता जास्त. अंदाजे, १८ ते ५५ वयोगटातील ४० टक्के लोकांना आपल्याला उच्च रक्तदाबाचा त्रास आहे हेच माहिती नसते.

